07 DEC TO 13 DEC 2020 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 05/12/2020 8:38 PM Page 1

CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ५१ सोमवार दि. ०७ डिसेंबर २०२० ते रविवार दि. १३ डिसेंबर २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## अल्पवयीन प्रियकर जीवानिशी गेला लव्हस्टोरीचा शेवट भावानेच केला

भिवंडी/अभिजित हिरे

**कोणत्याही प्रेम प्रकरणाचा शेवट चांगला होईलच असे सांगता येत नाही. खास करून जर प्रेमात जातीचा अडसर असेल तर असे प्रेम दोन्हीकडच्या लोकांना मान्य नसते आणि घरच्यांचा हा विरोध कधीकधी इतका टोकाला जातो कि त्यात सैराट प्रमाणे प्रेमी युगुलाचा जीव जातो. भिवंडीत अशाच एका घटनेत एका १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीच्या प्रियकराला मुलीच्या भावाने ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

'सैराट' या मराठी चित्रपटाच्या एका दृश्या सारखेच क्रूर हत्याकांड घडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हि घटना भिवंडी तालुक्यातील दापोडा-गुंदवली रस्त्या लगतच्या पाईपलाईन शेजारील निर्जन ठिकाणी घडली असून १४ वर्षीय अल्पवयीन बहिणीसोबत प्रेम करणाऱ्या १६ वर्षीय अल्पवयीन प्रेमविराची भावाने केली क्रूर हत्या केल्याचे उघड झाले. तर अंगावर थरकाप उडविणाऱ्या या घटनेमुळे 'सैराट'ची पुनरवृत्ती झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा करून आरोपीचा शोध पोलिसांनी सुरु केला असता आरोपी भावाला नालासोपारामधून अटक केली आहे. अजय रामकरण यादव (वय २०) असे अल्पवयीन प्रेमवीराच्या हत्येप्रकरणी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी अजय रामकरण यादव व फिर्यादी लालाजी झिनकान यादव (रा .भिवंडी हनुमान नगर, कामतघर) हे जवळचे नातेवाईक असून उत्तरप्रदेश मधील बस्ती जिल्ह्यातील एका गावात शेजारी राहतात. फिर्यादीचा १६ वर्षीय मृतक मुलगा हा सहा महिन्यापूर्वी गावी गेला होता. त्यावेळी गावातील आरोपीच्या १४ वर्षीय अल्पवयीन बहिणी सोबत त्याचे प्रेमसंबंध जुळले. विशेष म्हणजे या दोघांच्या प्रेमसंबंधावरून मूळ गावी या दोन्ही कुटुंबात वाद होऊन भांडण झाले होते. त्या भांडणाचा व बहिणीशी असलेली प्रेमसंबधचा राग मनात धरून त्याचा काटा काढण्याचे आरोपी

...पान २ वर

# बेफिकीर आयुक्तांमुळे वसई विरारकरांच्या नागरी सुविधांचे हाल परप्रांतीय भूमाफियांमुळे महापालिका प्रशासन झाले 'मालामाल'






वसई/वरिष्ठ प्रतिनिधी

ज्या महानगरपालिकेचा कार्यकाल संपून तिथला कारभार प्रशासनाच्या हाती येतो, तिथली सर्व जबाबदारी अर्थातच पालिका प्रशासनाची असते. पण वसई विरार महानगर पालिका क्षेत्रात वेगळेच चित्र बघायला मिळत आहे. इथले पालिका आयुक्त गंगाथरन डी. यांचा एकतर प्रशासनावर अंकुश नसावा किंवा पालिकेत लोक प्रतिनिधी नसल्याची संधी साधून अनधिकृत बांधकामे करणाऱ्या भूमाफियांकडून शंभर दोनशे कोटी जमा करून मालामाल होण्याचा प्लान असावा, असा वसई विरार महापालिका क्षेत्रातील लोकांनी संशय व्यक्त केला आहे.

विरार, बोळींज, आचोळे, नालासोपारा, पेल्हार, वालीव, नायगाव, वसई आणि नवघर अशा ९ प्रभाग क्षेत्रात अनधिकृत बांधकामे करणाऱ्या परप्रांतीय भूमाफियांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे आणि या बेकायदा बांधकामांमुळे लोकवस्ती वाढतेय. त्याचा वसई विरार महापालिकेच्या नागरी सुविधांवर परिणाम होत आहे. वीज, पाणी, परिवहन आरोग्य यासारख्या प्रमुख नागरीसेवा कोलमडून पडल्या आहेत. जे इथले अधिकृत नागरिक पालिकेला सर्व प्रकारचे कर भरून राहतात. ज्यांच्या कडून मिळणाऱ्या कराच्या पैशावर वसई विरार महापालिकेचा कारभार चालतो, त्यांना आज अनेक प्रकारच्या गैरसोयींचा सामना करावा लागतोय. तर पालिकेच्या ९ प्रभागात जे सहाय्यक आयुक्त बसवलेले आहेत ते लिपिकाच्या दर्जाचे असल्याने त्यांना त्यांचे नेमके काय काम आहे तेच ठाऊक नसल्याने ते गुळाच्या गणपती सारखे कार्यालयात बसून असतातय. तर ठेकेदारी पद्धतीने नियुक्त केलेले अभियंते अनधिकृत बांधकामे करणाऱ्या भूमाफियांकडून वसुली करून वरती पोचवण्याचे काम करतात. अशा तऱ्हेने पालिका प्रशासन आणि भूमाफियांचे आर्थिक साटेलोटे असल्याने भूमाफिया कुणालाही जुमानत नाहीत. सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकारांवर प्राणघातक हल्ले करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे.

वसई विरार महापालिका क्षेत्रातील वनविभागाची जमीन असो, पालिकेचा आरक्षित भूखंड असो कि आदिवासींच्या उदरनिर्वाहासाठी कसायला दिलेल्या जमिनी असोत. सर्व ठिकाणच्या जमिनीवर युपी-बिहार मधून आलेले आणि इथे बिल्डर बनून वावरत

...पान ६ वर

## पोलीस मित्रामुळे संसार उध्वस्त झाला व्यभिचारी पत्नीपायी पतीचा जीव गेला



मयत हापसे



आरोपी खंडागळे

अहमदनगर/क्राईम रिपोर्टर

**अनैतिक संबंध माणसाचा सुखी संसार उध्वस्त करून टाकतात आणि म्हणतात न कामातुरास न भय न लज्जा त्यामुळे कधी कधी असे संबंध उघडकीस आल्यानंतर सुद्धा काही महिला बेधडक वागत असतात, त्यांना बदनामीची अजिबात भीती वाटत नाही. पण त्यांच्या या व्यभिचाराचा त्रास त्यांच्या कुटुंबियांना आणि खास करून पतीला भोगावा लागतो. अहमदनगर येथील एका पोलिसाच्या पत्नीचे दुसऱ्या पोलिसाशी अनैतिक संबंध जुळले आणि याच अनैतिक संबंधामुळे तिच्या पतीवर विष घेऊन आत्महत्या करण्याची पाळी आली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली असून प्रियकर पोलीस मात्र फरार आहे.**

अहमदनगर तालुक्यातील देहरे या गावी एका सामान्य शेतकरी कुटूंबात विशाल हापसे याचा जन्म झाला होता. विशाल हापसे यास पोलिस होण्याची खुप इच्छा होती. त्यादृष्टीने त्याने प्रयत्न सुरु केले होते. सकाळी लवकर उठून रनिंग करणे, लांब उडी, उंच उडी यासह पोलिस भरतीसाठी आवश्यक सर्व कसरतींचा तो सराव करत होता. त्याच्या या प्रयत्नांना अखेर यश आले. सन २००२ साली तो अहमदनगर पोलिस दलात दाखल झाला. कुठलीही तक्रार अथवा सबब न सांगता तो नियुक्तीच्या जागी लागलीच हजर होत असे. सुटी मिळाली नाही तरी त्याची कुरबुर रहात नव्हती. वरिष्ठांचे आदेश आणी त्याचे पालन असा त्याचा शिरस्ता होता. पोलिस दलात नोकरी लागल्यानंतर लवकरच विशाल हापसे याचे लग्न ठरले व झाले. सोनाली सोबत विवाह झाल्यानंतर त्याच्या संसार वेलीवर साईश्वर आणि वेदीका या पुत्र व पुत्रीचे आगमन झाले. एकंदरीत विशालचा संसार व्यवस्थित सुरु होता.

सन २०१४ मधे लोणी पोलीस स्टेशन येथे नेमणूकीला असतांना

...पान ६ वर

## पोलिसाच्या जाळ्यात तलाठीबाई फसली चारित्र्याच्या संशयावरून जीव गमावून बसली

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत अरुणा

**स्त्रीलंपट पुरुषाला एकदा का बाईचे व्यसन जडले कि मग तो वेगवेगळ्या महिलांवर पतीच्या निधनानंतर त्यांच्यावर जाळे टाकून त्यांचा उपभोग घेत असतो आणि महिलाही अगदी सहजपणे अशा लंपट माणसाच्या जाळ्यात फसतात. मुंबई पोलीस दलात काम करणारा नितीन पवार हा सुद्धा असाच होता. पत्नी बरोबर मतभेद झाल्याने त्याने तिच्यापासून काडीमोड घेतला आणि त्यानंतर एका महिला होम गार्ड महिलेला पटवले. तिच्याशी त्याचे प्रेम संबंध सुरु असतानाच जळगाव मधील एका तलाठी महिलेशी त्याची ओळख झाली आणि तो तिच्या प्रेमात पडला आणि त्याने तिच्याशी लग्न केले. दरम्यान होमगार्ड असलेल्या प्रेयसीला हा प्रकार समजल्याने तिने त्याच्या विरुद्ध फिर्याद नोंदवली. त्यामुळे त्याची नोकरी गेली आणि तो तलाठी पत्नी सोबत राहू लागला. पण ती तलाठी असल्याने तिला लोकांचे सतत फोन यायचे अन् ती फोनवर बोलत राहायची. त्यामुळे तिचा त्याला संशय येऊ लागला आणि याच संशायातून त्याने तिची हत्या केली.**



आरोपी

अरुणाचे वडील परशुराम ठाकरे हे जळगाव पोलिस दलात नोकरीला होते. पोलिस दलाची सेवा बजावत असतांना त्यांचे अकाली निधन झाले. परशुराम ठाकरे यांचे निधन झाले त्यावेळी त्यांची मुलगी अरुणा हिचे वय जवळपास अठरा वर्ष होते. अठरा वर्षाची अरुणा लग्नायोग्य झाली होती. मुलगी अरुणा हिच्यासाठी वर संशोधन करणे, तिचे लग्न करुन देणे आदी जबाबदाऱ्या परशुराम ठाकरे यांना त्यांची लाईफलाईन संपुष्टात आल्यामुळे पुर्ण करता आल्या नाही. नियतीने त्यांच्या जीवनावर घाला घातला होता. वडील गेल्याची खंत अरुणाच्या मनाला बोचत होती. मात्र नियतीपुढे कुणाचेच काही चालत नसते. त्यानंतर काळ पुढे पुढे सरकत गेला. कॅलेंडरच्या तारखा बदलत होत्या,

...पान २ वर

## जिने दिला आसरा तिचेच नशीब फुटले नमकहराम नोकराने मालकिणीला लुटले

मुंबई/क्राईम रिपोर्टर

**आजकाल माणसाने कोणावर उपकार करायचे दिवस राहिलेले नाहीत. कारण ज्याच्यावर उपकार करायचे तो कधी नमकहराम होऊन उपकार कार्त्यालाच आयुष्यातून उठवील याचा नेम नाही. असाच प्रकार मुब्र्यात घडला. गावातल्याच एका तरुणाला एका महिलेने तिच्या पतीला सांगून घरकामाला ठेवले. पण त्या माणसाने खाल्ल्या मिठाला जगण्यायेवजी जिने रोजी रोटी दिली तिच्यावरच बलात्कार करून त्याचा अश्लील व्हिडिओ काढून तिला ब्लॅकमेल करू लागला. अखेर तिने पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवतच आरोपी नोकराला पोलिसांनी अटक केली.**

आपल्यावर केलेल्या उपकाराची जाण ठेवली पाहिजे. म्हणजे खाल्या मिठाला जागणारा कधीही सुखी होतोच. अडचणीच्या काळात जो आपल्याला मदतीचा हात देतो तो ईश्वर समान असतो. रामजीयावन भवानीप्रसाद वर्मा हा २१ वर्षीय तरूण घरची हालाकीची परिस्थिती म्हणून मोल मजूरी करण्यासाठी मुंबईत आला. कुणाची ओळख-पाळख नसताना ही घाटकोपर येथील ऐका कुटुंबाने त्याला घरकाम करण्याची नोकरी देऊन त्याला घरातच राहयला जागा हि दिली. त्यामुळे रामजीयावनचे सर्वच प्रश्न एकाच वेळी सूटले

...पान २ वर

## पतीच्या आयुष्याची दोरी पत्नीमुळे तुटली अखेर नऊ वर्षांनी खुनाला वाचा फुटली

लातुर/राम पाटोळे

**पैशाने सगळी सुख विकत घेता येतात. त्यामुळे प्रत्येक माणसाला पैशाची हाव असते आणि पैशाच्या याच लोभापायी माणूस एखादा गुन्हा करायलाही मागे पुढे पाहत नाही. पैशासाठी माणूस रक्ताच्या नात्यातील माणसाचाही जीव घेऊ शकतो किंवा त्याची फसवणूक करू शकतो. माणसाला कठोर मेहनत करूनही पैसा मिळवता येतो, पण आजकाल मेहनत करून आणि शरीर झिजवून पैसा मिळवण्या पेक्षा गुन्हेगारीच्या शॉटकट मार्गाने पैसा मिळवण्याकडे माणसाचा अधिक कल असतो. लातूर जिल्ह्याच्या निटूर गावातील एका महिलेने पैशासाठी चक्क आपल्या पतीचा एक कोटींचा विमा उतरवला आणि विम्याची हि रक्कम हडप करण्यासाठी चक्क विमा एजंट असलेल्या भावाच्या मदतीने पतीची हत्त्या केली आणि अपघातात पतीचा मृत्यू झाल्याचा बनाव केला. पण विमा कंपनीला संशय आल्याने त्यांनी पोलिसांकडे या प्रकरणी फिर्याद नोंदवली आणि तब्बल ९ वर्षांनी या खुनाला वाचा फुटली आणि सर्व आरोपींना पोलिसांनी अटक केली.**



लातूर जिल्हयातील निलंगा तालुक्यातील निटूर येथे आण्णाराव बनसोडे हे आपल्या कुंटूंबासह राहयाला होता. ते फर्निचर तयार करण्याचे काम करीत होते. त्याची पत्नी ज्योती ही त्यांना संसारात मदत करत होती. त्याना मुले बाळे लवकर झाल्याने त्याचा संसार सुखासमाधाने चालला

...पान २ वर

## पत्नीच्या संतापाचा भयंकर पारा चढला रागाच्या भरात पतीचाच मुडदा पाडला

जुन्नर/क्राईम रिपोर्टर

**संसारात भांड्याला भांडे लागताच असते. पण त्यातूनच जर एखादे भांडे तुटले, तर संसाराचा सर्वनाश होतो म्हणूनच पती पत्नी दोघांनीही संयमाने राहायचे असते. जरी एखाद्या कारणावरून वाद झाला असेल तर तो ताणायचा नसतो. एकमेकांना सांभाळून घ्यायचे असते. पण काही लोकांच्या रागाला डोळे नसतात. एकदा का त्यांच्या मनात संतापाची लाट उसळली कि मग समोर कोण आहे याचाही त्यांना विसर पडतो. जुन्नर जवळच्या एका गावात पती-पत्नीमध्ये शुल्लक कारणावरून भांडण झाले. त्यामुळे पत्नी चिडून माहेरी गेली. त्यानंतर पती तिला आणायला गेला. मात्र पत्नीच्या मनात पती विषयी इतका राग होता कि तिच्या माहेरी आलेल्या पतीवर लाकडी दांडक्याने हल्ला करून पत्नीने पतीची निर्घुण हत्त्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक केली आहे.**

जुन्नर, ४ डिसेंबर: पती व पत्नी यांच्यात झालेल्या भांडणातून पत्नीनंच पतीचा निर्घृण खून केल्याच्या धक्कादायक घटनेनं पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात खळबळ उडली आहे. ओतूरजवळील डोमेवाडी येथे पत्नीनं दांडक्यानं केलेल्या बेदम

...पान २ वर

## जमिनीचा वाद विकोपाला गेला; भावानेच भावाचा खून केला



मयत शिवाजी सावंत

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

**ग्रामीण भागातील वाद हे प्रामुख्याने शेती वरून असतात आणि विशेष म्हणजे ते भावकी मधेच असल्याने पंचायतीकडून मिटवले जातात, तर काही वाद न्यायालयापर्यंत जातात आणि याच वादातून माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि एकदा का माणूस सुडाने पेटला कि त्याच्या हातून काहीही घडू शकते. कोल्हापूर जिल्ह्यातील धामणे गावठी तसेच घडले. दोन चुलत भावांच्यात जमिनीच्या वाटणीवरून वाद होता आणि त्यातू दोघांची नेहमी भांडणे होत असत. मात्र एके दिवशी एकाची म्हैस दुसऱ्याच्या शेतात गेल्याने ठिणगी पडली आणि कडाक्याचे भांडण झाले आणि याच भांडणात संजय सावंत याने त्याचा चुलत भाऊ शिवाजी सावंत याचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**



आरोपी संजय सावंत

कोल्हापूर जिल्हा हा तसा सधन जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्हयातील बारा ही तालुके ऊसाचा साखर पट्टा म्हणून ओळखले जातात. त्यामुळे येथील शेतीला सोन्याचा भाव आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्याच्या हातात पैसा खुळखुळत असतो. आजरा तालुक्यातील धामणे गावातील बेलेवाडी रस्त्यावर सावंत कुंटूंबाची शेती आहे. शेतीला पाणी असल्याने ऊसाचे नगदी पीक ते घेत असतात. गावात सांवत कुंटुंब राहयला असून त्यांची नेहमी वर्दळ ही आपल्या शेताकडे असते. परसु सावंत आणि महादेव सावंत हे दोघे भाऊ सध्या मयत असल्याने त्याच्या शेतीचा वाद हा पुढे शिवाजी सावंत आणि त्याचा चुलत भाऊ संजय सावंत या दोघात चालु राहयला होता. धामणेतील गट नंबर ६१०(अ) मधील एक एकर चौदा गुंठे शेतजमीनीचा वाद होता. ही शेतजमीन दोघांच्या ही वाडवडिलार्जीत असल्याने त्याचा त्याचेवर हक्क होता. कागदोपत्री ही जमीन दोघांना ही समान गेलेली होती. परंतु ६१० (अ) या गट नंबरातील या शेतजमीनचा वाद हा गेल्या २० वर्षाहून अधिक काळ चालला आहे. अद्याप ही वाद काही केल्या मिटलेला नव्हता. त्यातूनच त्या दोघा सख्खा भावा भावात आणि दोन्ही कुंटूंबात वाद विवाद आणि मारामारी ही झाली होती. गेल्या २० वर्षापासून हा वाद खालच्या कोर्टातून वरच्या कोर्टात गेला तरी ही त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. सध्या हा वाद मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. दोघांच्या ही वतीने त्याचे वकील कोर्टात दावे प्रतिदावे करत हा

...पान २ वर

## चोराचा साथीदार साव बनून मदतीला आला प्रवासी महिलेला लुटून दोघांनी पोबारा केला

मुंबई/राजेंद्र वेदांते

**आजकाल गुन्हे आणि गुन्हेगारीची पद्धत इतकी बदलली आहे कि सर्वसामान्य माणसाला कोण चांगला माणूस आणि कोण गुन्हेगार याची सहजासहजी ओळख पटत नाही. पूर्वी हिंदी सिनेमात दाखवले जायचे कि एखाद्या तरुणीला पटवायचे असेल तर दोनचार भाडोत्री गुंडांना पैसे देऊन तिची छेड काढायला लावायचे आणि नंतर त्या हिरोने तिथे येऊन त्या गुंडांची धुलाई करून त्या तरुणीला वाचवण्याचा आव आणायचा. म्हणजेच मी मारल्यासारखे करतो तू रडल्या सारखे कर असा प्रकार असायचा. अगदी तसाच प्रकार ट्रेनमध्ये महिलांना लुटणाऱ्या दोन गुन्हेगारांनी केला आहे.**

रात्री पावणेबारा वाजता बोरीवली रेल्वे स्थानकात पुरुषांच्या डब्यात चढलेल्या एका महिलेला चाकूच्या धाकावर एका चोराने लुटण्याचा प्रयत्न केला. यावेळी त्या डब्यात केवळ एकाच माणूस हजार होता, तो त्या महिलेच्या मदतीला आला आणि त्याने त्या चोराला डब्यातून खाली ढकलले. पण गाडी सुरु होताच त्याला पुन्हा डब्यात बोलावून घेतले आणि दोघांनीही त्या महिलेला लुटले. लुटमारीची हि नवीन पद्धत पाहून पोलीसही हैराण झाले असून त्यांनी या दोन्ही चोरांना अटक केली आहे.

कोण गुन्हेगार आणि कोण साव हे ओळखणे फारच कठीण आहे. रूबाबदार दिसणारा, फाडफाड इंग्रजी बोलणारा व्यक्ती देखील गुन्हेगार असू शकतो. परंतु अशा या माणसातल्या गुन्हेगारा पासून सावध असले पाहिजे. हे गुन्हेगार अति धोकादायक असतात. हे आपल्याला विश्वासात घेऊन आपला घात करतात. बहुतांशी असे भामटे सहप्रवाशी बनून आपल्या सोबत असतात. म्हणून अनोळखी व्यक्ती जर खास करून

...पान ६ वर

CMYK

07 DEC TO 13 DEC 2020 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 05/12/2020 8:38 PM Page 1



## पान १ वरून....

### अल्पवयीन प्रियकर जीवानिशी...

अजयने ठरवले. त्याप्रमाणे आरोपी अजय हा भिवंडी तालुक्यातील मृतक मुलगा काम करीत असलेल्या ठिकाणी सायंकाळी पोहचुन त्याने बहाण्याने आपल्या सोबत त्याला दापोडा गुंदवली रस्त्या लगतच्या पाईपलाईन शेजारील निर्जन ठिकाणी घेऊन गेला. त्यांनतर आरोपीने आपल्याकडील धारदार हत्याराने आपल्या बहिणी सोबत प्रेमसंबंध प्रस्थापित करणाऱ्या अल्पवयीन प्रेमविराच्या पोटावर, छातीवर, डोक्यावर वार करून त्याला जीवे ठार मारले होते. या प्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात २८ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल होताच सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवीत पोलीस निरीक्षक राजेश वाघमारे यांनी आरोपी अजय रामकरण यादव याला नालासोपारा मधील एका घरातून ताब्यात घेऊन अटक केली आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक राजेश वाघमारे करीत आहेत.

### जिने दिला आसरा तिचेच नशीब...

होते. मात्र रामजीयावन वर्मा याने या कुटुंबाचा घात केला. त्याची वाईट नजर मालकीणीवर पडली आणि नको ते अघटीत घडले. ज्याला आपल्या घरात थारा दिला, अन्नपाण्याची राहण्याची व्यवस्था केली होती त्याच घरच्या मालकीणीला हा डसला होता. पण पोलीसांनी त्याला धडा शिकवला. मुंबई येथील घाटकोपर येथे नोकरानेच घरच्या मालकिणीवर अत्याचार करून तिला ब्लॅकमेल करत असल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नोकराने ऐवढ्यावरच न थांबता मालकिणीला तिचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ सोशल मिडियावर वायरल करण्याची धमकी देऊन तिच्याकडून लाखोंचे दागिने घेतले. नेहमीच्या त्रासाला कंटाळून अखेर मालकिनीने पंतनगर पोलिसठाण्यात धाव घेतल्यानंतर हा सर्व प्रकार उघकीस आला आहे. मूळचा उत्तर प्रदेशचा राहणारा आरोपी रामजीयावन भवानी प्रसाद वर्मा हा मुंब्रा परिसरात राहतो. घरची परिस्थिती हालाकीची असल्यामुळे तो नोकरीच्या शोधात होता. रामजीयावन हा पीडित महिलेच्या गावचाच होती. त्याची घरची परिस्थीती पाहून तक्रारदार महिलेने नवऱ्याला सांगून त्याला त्यांच्याकडेच कामाला ठेवले. काही दिवस राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे तो तक्रारदार महिलेकडेच रहात होता. मात्र उपकाराची जाणीव नसलेल्या रामजीयावनची त्याच्या मालकिणीवर वाईट नजर होती. ऐके दिवशी मालक घरी नसल्याचे पाहून रामजीयावनने मालकिणीवर जबरदस्ती केली. मालकिणीने आरडा ओरडा केला असता त्याने तिला आणि तिच्या पतीला जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच त्याने त्याच्या मोबाइलवर मालकिणीचा अश्लील व्हिडिओ आणि फोटो काढून त्या फोटोच्या आधारे तो मालकिणीला धमकावत होता. या सार्या घृणास्पद प्रकाराला तक्रारदार महिला कंटाळली होती. त्याने अश्लील व्हिडिओ आणि फोटो सोशल मिडियावर वायरल करण्याची धमकी देऊन अनेकदा तक्रारदार महिलेच्या घरी आणि घाटकोपर येथील एका ठिकाणी बोलावून अत्याचार केले. ऐवढ्यावरच न थांबता कालांतराने त्याने मालकिणीकडे पैशांची मागणी सुरू केली. पैसे देता येत नसल्यामुळे त्याने मालकिनीचे ८ ग्रॅम वजनाचे कर्णफुल, सोन्याचे मंगळसूत्र आणि रोख रक्कम १ लाख २० हजार रुपये उकळले. मात्र दिवसेंदिवस रामजीयावनच्या मागण्या वाढतच होत्या, रोजच्या या त्रासाला कंटाळून अखेर पीडित महिलेने आपल्या पतीला विश्वासात घेऊन आपल्यावर घडलेला प्रसंग सांगितला तेव्हा या दाम्पत्याने पंतनगर पोलिसात धाव घेत रामजीयावन विरोधात तक्रार नोंदवली. याप्रकरणी पंतनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून या प्रकरणाची गंभीर दखल घेत रामजीयावन वर्मा विरोधात ३७६ (एन), ३८६, ३२३, ५०४ (२), ५०६ भा.द.वि कलमांतर्गत गुन्हा नोंदवला असून त्याला अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलिस आरोपी रामजीयावनची अधिक चौकशी करीत असुन त्याचा मोबाईल ही पोलीसांनी जप्त केला आहे. त्या मोबाईल मधिल आक्षेपार्ह मजकूर व छायाचित्रे, विडीओ क्लीप पोलीस आरोपीच्या विरुद्ध पुरावा म्हणून न्यायालयात सादर करणार असल्याचे पोलीसांनी सांगितले.

### पतीच्या आयुष्याची दोरी पत्नीमुळे ...

होता. गेल्या ९ ते १० वर्षापूर्वी म्हणजे सन २०१० साली ज्योती हिच्या डोक्यात शॉर्टकटने पैसे मिळविण्याचा विचार सुरू झाला होता. ती त्या दृष्टीने विचार करत होती. तशी ती सुशिक्षीत असल्याने कोणत्या मार्गाने कसा पैसा मिळवायचा हे तिला लवकरच अवगत झाले. त्यातच तिचा आतेभाऊ रमेश विवेकी हा सारखा तिच्या घराकडे येत होता. तिचा नवरा फर्निचर तयार करण्याचे काम करत असल्याने त्यांच्या उत्पन्नाचे दुसरे कोणतेच साधन नव्हते. त्यातच तिचा आतेभाऊ रमेश विवेकी हा विमा कंपनीचा एंजट म्हणून काम करत होता. त्याने तिला पैसे मिळवण्यासाठी एक मार्ग सुचवलेला होता. त्यावर ती विचार करत होती. खूप विचारांअती तिने रमेशने सांगितलेल्या प्लॅनचा विचार केलेला होता. तिच्या दृष्टीने तो प्लॅन फायद्याचा होता. त्या दोघांनी सन २०१० मध्ये आण्णाराव बनसोडे याच्या नावाने एक कोटी रूपयांची विमा पॉलीशी उतरवली. त्यांनी काही महिने त्या पॉलीशीच्या विम्याचे हप्ते ही सरुळीत भरले.त्यानंतरच्या काही महिन्यातच म्हणजे सन २०१२ साली आण्णाराव बनसोडेहे निटूरहून लातूरला आपल्या दुचाकीने येत असताना रस्त्यात अपघात झाला होता. त्यातच त्यांचा मृत्यू झाला होता. त्यावेळी त्यांच्या पत्नीने म्हणजे ज्योती हिच्या फिर्यादीवरून औसा पोलीस स्टेशनमध्ये पोलीसांनी आण्णाराव बनसोडे याचा मृत्यू हा अपघाती मृत्यू म्हरून नोंद केली होती. त्यांनतर पोलीसांनी या घटनेचा तपास बंद केलेला होता. आण्णाराव बनसोडे याच्या पत्नीला नेमके हेच हवे होते. कारण तिच्या डोक्यात एक वेगळाच विचार होता. तिने रमेश विवेकी याच्या बरोबर मिळून मयत आण्णाराव बनसोडे याच्या नावाने एक कोटी रूपयांचा अपघाती विमा उतरविला होता. आणि आता ती विम्याची रक्कम मिळविण्यासाठी तिने प्रयत्न चालविला होता.तसा तिने विम्याच्या रक्कमेसाठी विमा कंपनीकडे क्लेम ही लावला होता. आण्णाराव बनसोडे याच्या विम्याचा क्लेमचा रितसर अर्ज विमा कंपनीला मिळाल्याने विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्याचा मृत्यू कसा झाला याची कागदोपत्री पडताळी करण्याचे काम सुरू केले होते.त्यांची तशी चौकशी ही आंरभली होती. त्यांनी त्यावेळी घटनास्थळी ही भेट दिली होती. त्यावेळी त्याना आण्णाराव बनसोडे याच्या अपघाती मृत्यू बाबत शंका येत होती. त्यांनी औसा पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकाऱ्याकडे ही त्यांनी बनसोडे याच्या मृत्यूची माहिती घेतली होती. त्यावेळी त्याचा मृत्यू हा अपघाती मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली होती. तरीही विमा अधिकाऱ्याच्या मनात कुठे तरी शंकेची पाल चुकचुकत होती. त्यांना काही गोष्टी विसंगत वाटत होत्या.तशी शंका त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना बोलून दाखवली व तशी तक्रार ओसा पोलीस स्टेशनला दाखल केली.त्यातच विमा कंपनीने तशी शंका व्यक्त केल्याने पोलीस अधिक्षकांनी या घटनेची पुन्हा तपास करण्याचे पोलीसांना आदेश १५ सप्टेंबर २०२०ला दिले. या घटनेचा तपास पोलीस अधिक्षकांच्या सुचनेनुसार पोलीसांनी व स्थानिक गुन्हा अन्वेषणाचे पोलीस करू लागले होते. त्यानुसार पोलीस पुन्हा आण्णाराव बनसोडे यांच्या अपघाती मृत्यूची चौकशी करू लागले होते.त्यातच मयत आण्णाराव याच्या कुटुंबातील इतर लोकांना ही शंका येवू लागली होती. त्यामुळे मयत आण्णाराव याचे भाऊ सोमनाथ बनसोडे यांनी विम्याची रक्कम हडप करण्यासाठी ज्योती बनसोडे यांनी भाऊ आण्णाराव बनसोडे याचा खून करून तो खून अपघाती मृत्यू झाल्याची तक्रार पोलीस स्टेशनला दाखल केली.त्या दृष्टीने पोलीसांनी या घटनेचा नव्याने तपास सुरू केला होता. सोमनाथ बनसोडे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी या घटनेतील संशयीत ज्योती हिला चौकशीसाठी पोलीस स्टेशनला बोलावून घेतले होते. गेल्या ९ वर्षापूर्वी आपल्या पतीचा अपघाती मृत्यू झाल्याची ती पोलीसांना सांगत होती. पोलीस तिला उलट सुलट प्रश्न विचारीत होते. तिच्या घरची परिस्थिती बेताची होती.तिचा नवरा फर्निचर बनवण्याचे काम करीत होता. मग एवढया मोठया रक्कमेची पॉलीशी कशी काय उतरवली गेली? या प्रश्नाचे उत्तर तिला समर्पक असे देता येईना. तेथेच ती पोलीसांच्या जाळ्यात अडकली होती. त्यावेळी तिने पोलीसांना आपला आते भाऊ रमेश विवेकी हा विमा कंपनीचा एजंट असून त्यानेच शॉर्टकटने पैसे मिळविण्यासाठी पती आण्णाराव बनसोडे याच्या नावाने एक कोटी रूपयाच्या विमा उतरविण्याचा सल्ला दिला होता. ज्योती हिचा भाऊ रमेश विवेकी हा विमा एजंट म्हणून काम करीत असला तरी तो एक लेखक ही होता. त्याचे दमण आणि इतर काही पुस्तके ही प्रसिध्द झाली आहेत. त्याचे डोके जरा सुपीकच होते.ज्योती हिचा नवरा कायम आजारी असायचा. त्यातच त्याच्या घरात कायम पैशाची अडचण असायची. ही गोष्ट ज्योतीने रमेश याला सांगितली होती.त्याने तिला यावरती मार्ग सुचविला होता. त्यानुसार ज्योती हिने आतेभाऊ रमेश याच्या मदत्तीने पती आण्णाराव याचे नावे एक कोटी रूपयाचा अपघाती विमा उतरविला होता. त्या विम्याचे हप्तेही त्यांनी काही महिने भरलेले होते. त्यामागे त्याचा वेगळाच प्लॅन होता. त्यानंतर सन २०१२ मध्ये आण्णाराव बनसोडे हे निटूरहून लातुरला जात असताना अपघात झाला होता. त्या अपघातात त्याचा मृत्यू झाला असल्याची नोंद ज्योती हिने औसा पोलीस स्टेशनला केली होती. पोलीसांनी याचा तपास करत असताना काही त्रुठी राहिल्या होत्या. त्याचा अपघाती मृत्यू नसून तो खूनच होता. हे त्यावेळी त्याच्या तपासात त्यांनी तशी नोंद केली नव्हती. किंवा त्याचा तसा त्यांनी शवविच्छेदनाचा अहवाल तयार केला होता. म्हणजेच हे सगळे संगनमताने झाले होते असेच म्हणावे लागेल. पोलीसांनी १५ नोव्हेंबर २०२० ला पुन्हा या घटनेचा तपास सुरू केल्यावर मयत आण्णाराव याच्या पत्नी ज्योतीला ताब्यात घेऊन तिच्याकडे या गुन्हयाची चौकशी केली असताना तिने विमा एंजट रमेश विवेकी आणि त्याचा साथीदार गोविंद सुबोधी याच्या मदतीने खून केल्याचे पोलीसांना सांगितले. तिने सांगितलेल्या माहितीवरून पती आण्णाराव याचा तिने घरात कुणी नसताना रमेश विवेकी व गोविंद सुबोधी याच्या मदतीने गळा आवळून खून केला होता. नंतर त्याचा मृतदेह निटूर लातूर हायवे मार्गावर रस्त्याच्या मध्ये आणून टाकला होता. दुसऱ्या दिवशी लोकांना त्या रस्त्यावर आण्णारावचा मृतदेह मिळाला होता.त्यावेळी तिने घटनेचे दिवशी पती लातूरला गेले होते. परत निटूरला येत असताना कुठल्या तरी अज्ञात वाहनाने ठोकर मारल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला असे घरच्या व इतर लोकांना सांगितले. आणि तशी नोंद ओसा पोलीस स्टेशनला केली. या सगळ्या घटने पाठीमागचा मास्टर मांईड विमा एजंट रमेश विवेकी होता. तिने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलीसांनी २० ऑक्टोबर २०२० रोजी या घटनेतील रमेश विवेकी व ज्योती बनसोडे यांच्या विरोधात न्यायालयात खून, फसवणूक भा.दं.वी.३०२,२०१,४२० या गुन्हयाची नोंद करून त्याच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.त्यांनतर ३० नोव्हेबर २०२० ज्योती बनसोडे आणि रमेश विवेकी यांना ताब्यात घेऊन बोलते केले असता. त्याने आपल्या गुन्हयाचा पाढा पोलीसासमोर वाचला होता. पोलीसांनी या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेच्या तपासात कुचराई केल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस अधिक्षक यांनी औसा पोलीस स्टेशनमधील कांबळे आणि सुडे याना निलंबित केले होते. सर्व काही संशयास्पद असताना त्यांनी पोलीस तपासात कुचराई केल्याने त्यांना नोकरी गमवावी लागली होती. विमा कंपनीच्या सर्तकतेमुळे ९ वर्षांनी आण्णाराव बनसोडे याच्या खूनाला वाचा फुटली होती. पोलीसांनी ही परत या गुन्हाची फाईल ओपन करून संशयीत आरोपीना ताब्यात घेऊन विमा कंपनीला फसवण्याचा कट उघडकीस आणला होता. ज्योती बनसोडे व तिचा आतेभाऊ रमेश विवेकी या दोघांचा विमा कंपनीला फसवून शॉर्टकटने पैसे मिळवण्याचा प्रयत्न फसला होता. पण त्यात विनाकारण आण्णाराव बनसोडे याचा खून करण्यात आला होता. पैशासाठी कधी, कोण काय करेल हे सांगता येत नाही. नवऱ्याच्या नावावरील विम्याच्या रक्कमेला सरळ वारस म्हणून मृत्यू पश्चात अनेकजण पत्नीच्या नावाची नोंद करत असतात. त्यात गैर ही काही नसते. परंतु विम्याच्या परताव्याची रक्कम जर मोठी असेल तर पत्नीच्या ही मनात भलते सलते विचार येतात. आणि ती कुणाच्या ना कुणाच्या सल्लयाने ती रक्कम मिळविण्यासाठी कोणत्या थराला जाते हेच या घटनेवरून दिसून येते. ही घटना केवळ एक कोटी रूपयांची विम्याची रक्कम मिळविण्यासाठी घडली किंवा ज्योतीचे कुणाबरोबर अनैतिक संबंध होते. त्यातून तिने हा कट रचून पतीला मारले याचा शोध पोलीस घेत आहेत. या घटनेचा पुढील तपास औसा पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

### पोलिसाच्या जाळ्यात तलाठीबाई...

घडयाळाचे काटे पुढे पुढे सरकत होते. वडील परशुराम ठाकरे यांची पुण्याई आणी शासनाची कृपा फळाला लागली. तिचे वडील परशुराम ठाकरे यांच्या निधनानंतर चार वर्षानी सन २००४ मधे अरुणाला अनुकंपा तत्वावर महसुल खात्यात नोकरी मिळाली. ती तलाठी झाली. तलाठी झालेल्या अरुणाला वेळोवेळी बदलीनिमीत्त नियुक्तीच्या जागी जावे लागत होते. दरम्यान अरुणाचा भाऊ प्रल्हाद हा देखील मुंबई पोलिस दलात दाखल झाला. अरुणाला महसुल खात्यात व तिचा भाऊ प्रल्हाद याला मुंबई पोलिस दलात नोकरी तसेच तिच्या आईला सुरु झालेले पेन्शन आदी बाबी जुळून आल्यामुळे परिवारात एकंदरीत सुखा समाधानाचे वातावरण होते. मात्र सन २०१६ मधे अरुणाचा मुंबई पोलिस दलातील भाऊ प्रल्हाद याचे अकाली निधन झाले. त्यामुळे भुसावळ येथील अष्टविनायक कॉलनीत राहणाऱ्या ठाकरे परिवारावर चार वर्षापुर्वी पुन्हा आभाळ कोसळले. भाऊ प्रल्हाद याच्या मृत्यूच्या कागदपत्रांची पुर्तता करण्याकामी तलाठी अरुणाला वेळोवेळी मुंबईला जावे लागले. कारण घरात तिच एकमेव शिकलेली अर्थात सज्ञान होती. तिचा लहान भाऊ भागवत यास सरकारी कामकाजाच्या चालीरितीचे हव्या त्या प्रमाणात ज्ञान नव्हते. त्यामुळे वेळोवेळी अरुणाला मयत भाऊ प्रल्हाद याच्या मृत्यूच्या कागदपत्रांची पुर्तता करण्याकामी मुंबई पोलिस दलात जाण्याचा योग आला. वारंवार मुंबई पोलिस दलाशी संपर्क आल्यामुळे नितीन मोतीराम पवार या पोलिस कर्मचाऱ्यासोबत तिची ओळख झाली. लव्ह ॲट फर्स्ट साईट अर्थात पहिल्याच नजरेत नितीन पवारच्या मनात अरुणा भरली. नितीन पवार हा एक घटस्फोटीत कर्मचारी होता. सन २००८ च्या बॅचचा कर्मचारी असलेल्या नितिन पवारचे लग्न सन २०१० मधे झाले होते. लग्नानंतर त्याचे पत्नीसोबत काही जमेना. त्याचे पत्नी सोबत रोज काहीना काही कारणाने वाद सुरु झाले. दरम्यानच्या काळात लग्नानंतर त्याच्या संसार वेलीवर एका पुत्ररत्नाचे आगमन झाले. नितीन पवार सोबत होणाऱ्या रोजच्या वादाला त्याची पत्नी वैतागली होती. तिने त्याच्यापासून काडीमोड घेण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर अवघ्या तिन वर्षातच सन २०१३ मधे पती – पत्नीचा घटस्फोट झाला. घटस्फोटानंतर नितीन पवार याच्या जीवनात एक होमगार्ड महिला आली. त्याने त्या होमगार्ड महिलेवर मोहिनी घातली. ती महिला होमगार्ड त्याच्या प्रेमाच्या जाळ्यात फसली. आपण दोघे लवकरच लग्न करु असे म्हणत त्याने तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढली व ती देखील त्याच्या जाळ्यात कळत नकळत ओढली गेली. माझा घटस्फोट झाला असल्यामुळे मी आता एकटाच असून माझ्यावर कुणाचे बंधन नसल्याचे त्याने त्या होमगार्ड महिलेला सांगत तिच्याशी अजून संपर्क साधला. या संपर्कातून दोघांचा सहवास वाढला. या सहवासातून दोघात प्रेमसंबंध अजून घट्ट झाले. त्यामुळे दोघांनी सर्व प्रकारचे संबंध प्रस्तापित केले. हा सर्व एपीसोड सुरु असतांना त्याच्या जीवनात आता तलाठी अरुणा ठाकरे आली. वास्तविक तलाठी अरुणा ही त्याच्यापेक्षा वयाने सहा ते सात वर्षानी मोठी होती. तो अरुणापेक्षा सहा ते सात वर्षाने लहान होता. ती वयाने मोठी असतांना देखील त्याने तिला आपल्या प्रेमजाळ्यात ओढले. आपण दोघे एकाच समाजाचे असल्यामुळे आपल्या लग्नाला काही अडथळा येणार नाही असे म्हणत त्याने अरुणाला देखील आपल्या प्रेमजाळ्यात ओढण्याचा प्रयत्न सुरु केला. त्या जाळ्यात महिला होमगार्ड प्रमाणे अरुणा देखील आली. नितीन पवार याने होमगार्ड महिलेसोबत देखील संबंध प्रस्थापित केले होते. तसेच समांतर पातळीवर अरुणासोबत देखील प्रेमाची व लग्नाची बोलणी सुरु ठेवली होती. अरुणाचे वय जवळपास चाळीस वर्ष झाले होते. नोकरीच्या व्यापात व इतर प्रापंचीक जबाबदा–या पार पाडत असतांना तिचे लग्न राहून गेले होते. त्यातच ती आता चाळीशीच्या जवळपास आली होती. आता तिच्या जीवनात तिच्यापेक्षा कमी वयाचा नितीन पवार आला होता. तो तिला लग्नाची मागणी वजा गळ घालत होता. पत्नी नांदत नसून घटस्फोट झाल्याचे सांगून तो लग्न करण्यास तयार असल्याचे तिला म्हणत होता. अखेर एकमेकांच्या सहमतीने दोघांनी निवडक नातेवाईकांच्या उपस्थितीत सन २०१७ मधे लग्न केले. नितीन पवार हा मुळ नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथील रहिवासी होता. नितीन पवार याचे हे दुसरे तर अरुणाचे पहिले लग्न होते. नितीन पवार याचे लग्न झाल्याचे समजताच त्याची महिला होमगार्ड प्रेयसी चिडली. मला प्रेमाच्या आणाभाका देतो आणी लग्न दुसरीशी करतो असे म्हणत तिने त्याला खडे बोल सुनावले. तिने नितीन पवार विरुद्ध मुलुंड पोलिस स्टेशनला बलात्काराचा गुन्हा दाखल केला. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर सन २०१९ मधे नितीन पवार यास मुंबई पोलिस दलातून निलंबीत करण्यात आले. पोलिस खात्यातून निलंबीत झाल्यानंतर नितीन पवार हा आर्थिक व मानसिकदृष्ट्या काहीसा हतबल झाला. अरुणा पाचोरा तालुक्यात तलाठी म्हणून काम बघत होती. ती पाचोरा येथे रहात होती. नोकरी हातातून गेल्यामुळे तो अरुणाकडे पाचोरा येथे राहण्यास आला. दरम्यान अरुणा ही तलाठी असल्यामुळे तिला कामानिमीत्त लोकांचे सतत फोन येत होते. महसुलच्या कामानिमीत्त तिला वारंवार येणारे फोन बघून नितीन पवार तिच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याचे म्हटले जात आहे. नोकरीला असतांना तो सुटीच्या दिवशी अथवा अधूनमधून पाचोरा येथे अरुणाला भेटण्यासाठी येत असे. मात्र नोकरीतून निलंबीत झाल्यापासून तो पाचोरा येथे अरुणाच्या घरी येवून राहू लागला. महसुलच्या कामानिमीत्त अरुणाला सतत येणारे फोन नितीन पवार याच्या मनात संशय निर्माण करत होते. तो तिच्या चारित्र्यावर संशय घेवू लागला. त्यातून वाद होवू लागले. तिला तो अधूनमधून मारहाण व शिवीगाळ करु लागला. हा प्रकार तिला असह्य झाला होता. एके दिवशी अरुणा व नितीन असे दोघे जण अरुणाच्या आईकडे भुसावळ येथे आले होते. त्यावेळी त्याने चारित्र्याचा संशय घेत तिला शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप तिच्या आईने केला होता. २९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास चारित्र्याचा संशय घेत नितीन पवार याने त्याची पत्नी अरुणा हिच्या डोक्यावर कोणत्यातरी टणक वस्तूने प्रहार केला. या हल्लयात तिच्या डोक्याला जबर दुखापत झाली व काही वेळाने ती मृत्युमुखी पडली. तिला दवाखान्यात दाखल केले त्यावेळी ती मयत अवस्थेत होती. तिला मयत अवस्थेत दवाखान्यात दाखल केल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. या हल्ल्याची माहीती समजताच अरुणाची आई व इतर नातेवाईक भुसावळ येथून लागलीच पाचोरा येथे दाखल झाले. यावेळी नितीन पवार याने अरुणा पायरीवरुन पडल्याचा बनाव केला. ती पायरीवरुन पडून मृत्युमुखी झाल्याचे नितीन पवार याने म्हटले. मात्र तिच्या अंगावर कुठेही खरचटल्याची व्रण अथवा निशानी नव्हती. तिच्या डोक्यावरील खोलवर झालेली जखम बघता तिच्या डोक्यावर टणक वस्तूने प्रहार केला असल्याचे स्पष्ट दिसत होते. मयत अरुणाची आई मीराबाई परशुराम ठाकरे यांच्या फिर्यादीनुसार पाचोरा पोलिस स्टेशनला नितीन मोतीराम पवार (मुळ रा. लासलगाव – नाशिक हल्ली मुक्काम मोरया नगर पाचोरा–जळगाव) याच्याविरुद्ध भाग ५ गु.र.न. ४१८/२० भा.द.वि.३०२, ४९८ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी नितीन पवार यास अटक करण्यात आली. पुढील तपास पो.नि. किसनराव नजनपाटील व त्यांचे सहकरी कैलास पाटील करत आहेत.

### पत्नीच्या संतापाचा भयंकर पारा...

मारहाणीत पतीचा मृत्यू झाला. जयवंत चिमाजी शिंगोटे (वय–४३, रा.खामुंडी, ता.जुन्नर, जि. पुणे) असं मृत व्यक्तीचं नाव असून छाया जयवंत शिंगोटे असं आरोपी महिलेचं नाव आहे. जयवंत चिमाजी शिंगोटे व त्यांची पत्नी छाया जयवंत शिंगोटे यांचे दहा दिवसांपूर्वी भांडण झालं होतं. त्यानंतर छाया शिंगोटे या माहेरी डोमेवाडी येथे निघून गेल्या होत्या. रविवारी छाया यांचे पती जयवंत डोमेवाडी येथे आले होते. त्या ठिकाणी त्यांचे पत्नीसोबत पुन्हा भांडण झालं. संतापलेल्या छाया यांनी पती जयवंत यास दांडक्यानं बेदम मारहाण करुन जिवे ठार मारलं आणि बाजूला टाकून दिलं. त्यानंतर मयत जयवंत यांचा चुलतभाऊ उत्तम शिंगोटे यांना त्यांच्या पुतण्याने फोन करुन सांगितले की जयवंत निपचित पडला आहे. त्यानंतर उत्तम शिंगोटे हे डोमेवाडी येथे गेल्यानंतर त्यांना जयवंत शेतात निपचित पडल्याचं त्यांना दिसलं. याबाबत त्यांनी जयवंत याच्या पत्नीकडे विचारणा केली असता पत्नीनं त्यांना कुणीतरी मारहाण करुन या ठिकाणी आणून टाकले असल्याचं सांगितलं. नंतर जयवंत यास प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. त्यानंतर उत्तम शिंगोटे यांनी याबाबत ओतूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पत्नी छाया हिस अटक करुन पोलिसी खाक्या दाखविला असता छाया हिने पतीचा खून केला असल्याची कबुली दिली. या प्रकरणी आरोपी पत्नीला पोलिसांनी अटक केली असून कोर्टानं तिला तिन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. याबाबतचा तपास ओतूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे व पोलिस उपनिरिक्षक आकाश शेळके पुढील तपास करत आहेत.

### जमिनीचा वाद विकोपाला गेला...

दावा कोर्टात ओढून ताणून नेत आहेत. शेतजमीनीचा वाद हा जरी कोर्टात असला तरी शिवाजी सावंत आणि संजय सावंत या दोघा चलुत भावातील भांडणे ही गावी धामणे येथे होत होती. त्या भांडणात कधी शिवाजी तर कधी संजय दोघे एकमेकाला बघून घेण्याची भाषा करत होते. दोघांची मुले ही आता मोठी झाली असल्याने ते ही या भांडणात एकमेकांच्या अंगावर जात होते. त्यातच या वादात घरातील बायका तोंड घालत असल्याने हा वाद आणखीनच चिघळलेला होता. दोघांची ही कुंटुंबे त्या वादातीत शेतजमीनीत एकमेकांना येण्यास वहिवाट करण्यास मज्जाव करत होते. वर्षानुवर्ष हा वाद घुमत असल्याने बऱ्याच वेळेला मारामारी भांडणे होऊन पोलीस केस ही झाली होती. दोघेही तसे शांत बसणाऱ्यातील नव्हते. दोघे ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा करत असल्याने त्याचेत खुन्नसीपणा वाढलेला होता. कोण कुणाची कधी गेम करेल हे काही सांगता येत नव्हते. त्यातच संजय हा जरा तापट आणि टारगट स्वभवाचा होता.त्याच्या चिडखोर स्वभावामुळे तो जास्तच आक्रमक होत होता. त्याला राग सहन होत नव्हता. भांडणात तो आणि त्याची बायको शिवाजीच्या अंगावर जात होते. मागे एकदा दोनदा त्याचेत लाठया काठयांनी मारामारी झाली होत्या. त्यावेळी आजरा पोलीस स्टेशनला दोघांच्या ही कुंटूबानी परस्पर एकमेकांच्या विरोधी तक्रारी दाखल केल्या होत्या. याचा राग दोघांच्या ही मनात होता. शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजणेच्या सुमारास शिवाजी हा गट नंबर ६१० मधील वादातीत शेतजमीनीत आपल्या म्हैशीला चारण्यासाठी घेऊन गेला होता.त्यावेळी तेथे संजय हा आपल्या आईसमवेत आला.त्याने शिवाजी याला येथे तुझी म्हैस चारायला आणू नकोस. मी या जमीनीचा मालक आहे.असे म्हणून तो आणि त्याची आई पारूबाई ही शिवाजीबरोबर भांडण काढू लागले होते.त्या दोघात तू तू मै. मै चालु होती. दोघे ही शिवीगाळ करत एकमेकांच्या अंगावर धावून जात होते. त्यातच संजयची आई संजयला शिव्याला मारून टाक. म्हणजे हा प्रश्न कायमचा निकालात निघेल. त्याला व त्याच्या घरच्या लोकांना जास्त मस्ती आलेली हाय. त्यांची मस्ती जिरावायलाच पाहिजे म्हणून शिव्या देत त्या भांडणात ती तेल ओतण्याचेच काम करीत होते. दोघे ही एकमेकाला भिडले होते.. संजय तर शिवाजीची गेम करायची या तयारीनेच आला होता. भांडणात संजयने शिवाजीला मारहाण करत खाली ढकलून पाडल्यावर त्याच्या डोळ्यात त्याने मिरचीची पूड टाकली. त्यामुळे शिवाजीला पुढचे काहीच दिसत नव्हते. दोघांच्यात झटापट चालु असताना नेमकी हिच संधी साधून संजयने त्याच्याकडील धारदार कोयत्याने, त्याने शिवाजीच्या पोटावर, छातीवर वार करायला सुरूवात केली. त्याने कोयत्याने वार करताचा शिवाजी हा आडवा पडला होता. तर संजयच्या हाताला मार लागला होता. ओरडू लागला होता. त्या गटनंबर पासून वस्ती ही थोडया लांब अंतरावर होती. तर गाव हे दीड दोन कि.मी अंतरावर होते. सकाळच्यावेळी रस्त्यावर ही कुणीच नव्हते. त्यामुळे शिवाजीच्या ओरडण्याने काहीच फरक पडत नव्हता. रागाच्या भरात संजयने त्याच्यावर कोयत्याने सपासप वार करायला सरूवात केली. त्यासरशी जागीच शिवाजी हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याचा जागीच मृत्यु झाला होता. ही गोष्ट लक्षात येताच तो आणि त्याची आई घटनास्थळावरून निघून गेले होते. घटनेनंतर गावात येऊन संजय याने शिवाजीने आपल्यावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचे व त्याच्यावर मी ही धारदार हल्ला केला असून तो जखमी असल्याचे गाववाल्याना सांगू लागला होता. व त्यानंतर तो आजरा पोलीस स्टेशनला स्वता:हून हजर झाला होता. लोकांना त्याच्यातील वादाची माहिती असल्याने काही तरी विपरीत घडल्याचे लोकांना शंका आली म्हणून गावातील काही लोक धामणे येथून बेलेवाडी रस्त्याने जात गट नंबर ६१०मधील सावंत याच्या शेतात पोहचले होते. त्यावेळी शिवाजी सांवत हा रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडल्याचे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी गावात येऊन या घटनेची माहिती मयत शिवाजीच्या घरच्या लोकांना दिली होती. शिवाजीचे घरचे लोक ही तातडीने ही माहिती मिळताच घटनास्थळी आले होते. घटनास्थळावरील दृश्य बघून त्याच्या घरच्या लोकांनी मोठयाने अक्रोश केला होता. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. या घटनेची माहिती आजरा पोलीस स्टेशनला देण्यात आली.खूनाच्या या घटनेची माहिती मिळताच गडहिंग्लज उपविभागीय अधिकारी गणेश इंगळे व आजरा पोलीस ठाण्याचे स.पो.नि.बालाजी भांगे यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली होती. घटनास्थळी रक्ताने माखलेल्या चप्पला, धारदार कोयता पडला होता. पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रूग्णालयात पाठवून दिला. या घटनेची त्रफर्याद मयत शिवाजीचा भाऊ पांडुंरग परसु सावंत याने आजरा पोलीस ठाण्यात दिली होती. त्याने आपल्या फिर्यादीत संजय महादेव सावंत आणि त्याची आई पारूबाई महादेव सावंत यांची नावे पोलीसांना सांगितली होती. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी या घटनेतील संजय सावंत हा स्वतःहून पोलीसात हजर झाला असल्याने संजय याच्या हाताला आणि डोक्याला मार लागल्याने पोलीसांनी त्याचेवर उत्तुर येथील प्राथमिक उपचार केंद्रात उपचार करून त्याला परत पोलीस स्टेशनला आणले. त्यानंतर त्याची आई पारूबाई सावंत हिला देखिल पोलीसांनी चौकशीसाठी पोलीस स्टेशनला बोलावून घेतले. त्याच्याकडे पोलीसांनी या घटनेची चौकशी केली असता.त्याने व त्याच्या आईने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. पांडुरंग सावंत यांच्या फिर्यादीवरून पोलीसांनी आजरा पोलीस ठाण्यात शिवाजी परसु सावंत (वय ५२) रा.धामोणी याच्या खून प्रकरणी संजय महादेव सावंत (वय ५४) व त्याची आई पारूबाई महादेव सावंत (वय ७८)रा.दोघेही धामोणी याचे विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना अटक केले होते. त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा पुढील तपास आजरा पोलीस ठाण्याचे स.पो.नि. बालाजी भांगे आणि त्याचे सहकारी करत आहेत. वाडवडिलार्जीत शेतीचा वाद विकोपाला गेली की तो कधीच मिटत नसतो एका पिढीतून दुसऱ्या पिढीत तो वाद वाढतच जातो. म्हणूनच शेतजमीनीचा वाद हा वेळेतच मिटवावा लागतो. नाही तर त्यातून काहीच निष्पन्न न होता तो वाद विकोपाला जातो आणि त्यातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते. हेच या घटनेवरून दिसून येते.

07 DEC TO 13 DEC 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 05/12/2020 8:39 PM Page 1



# आमदार सतीश चव्हाण यांच्या विजयाचा देवणीत महाविकास आघाडीकडून जल्लोष



**देवणी/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व काँग्रेस या महाविकास आघाडीचे विधान परिषदेचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यानी जवळपास अट्टावन हजारांचे मताधिक्य घेऊन औरंगाबाद पदवीधर मतदार संघाची निवडणूक जिंकली आहे.

या निवडीचा महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी बोरोळ चौकात फटाक्याची आतिशबाजी करून व पेढे वाटून जल्लोष केला. औरंगाबाद पदवीधर मतदार संघातून आमदार सतीश चव्हाण व शिरीष बोराळकर यांच्यात थेट लढत झाली. आमदार सतीश चव्हाण यांना १ लाख १६ हजार ६३८ मते मिळाली. भाजपाचे शिरीष बोराळकर यांना ५७ हजार ८९५ मते मिळाली. महाविकास आघाडीचे आमदार सतीश चव्हाण हे ५७ हजार ८९५ मतांनी विजयी झाले. आमदार चव्हाण यांच्या विजयाचा शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी देवणी येथील बोरोळ चौकात फटाक्याची आतिशबाजी करून विजयी जल्लोष करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मल्लीकार्जून मानकरी, शिवसेनेचे तालुकाप्रमुख पंडीत भंडारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अनिल इंगोले, अनिल कांबळे, अनिल रोट्टे, काशिनाथ मानकरी, राजीव बंडगर, फेरोज शेख, अमरदीप बोरे, शिवा कांबळे, बालाजी वळसांगविकर, रमेश कोतवाल, प्रताप कोयले, लक्ष्मण रणदिवे, कृष्णा पिंजरे, रवि बिरादार, महेश जाधव, गणपत शिंदे, जाफार मोमीन, नामदेव मुराळे, डॉ.सुरशेट्टे आदीसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मच्छिमार युवकांनी ७७व्या प्रशिक्षण सत्रासाठी अर्ज करावे

पालघर : मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण सातपाटी हे केंद्र राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाचे आहे. येथे सागरी मत्स्यव्यवसाशी संबंधित नौकानयन व सागरी इंजिन देखभाल व परिचालनाचे प्रशिक्षण दिले जाते. या केंद्रात देण्यात येणारे प्रशिक्षण ६ महिन्यांच्या कालावधीचे असून सदर प्रशिक्षण वर्ग दि.०१ जानेवारी २०२१ ते ३० जुन २०२१ पर्यंत आहे. या प्रशिक्षणाचे अर्जाचे नमुने मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, सातपाटी यांच्या कार्यालयातून कार्यालयीन वेळेत व सुट्टीचे दिवस वगळून घेऊन जावेत. परिपूर्ण अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख दि.३१ डिसेंबर २०२० राहील. या प्रशिक्षण वर्गासाठी २२ विद्यार्थी घेण्यात येणार आहेत. दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांना रु.१०० प्रतिमहा तर दारिद्रेषेवरील विद्यार्थ्यांना रु.४५० प्रतिमहा प्रशिक्षण फि आकारण्यात येते. या प्रशिक्षणासाठी विद्यार्याची पात्रता खालील प्रमाणे आहे.उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष असावे, उमेदवार किमान चौथी पास असणे आवश्यक आहे. उमेदवारांस पोहता येणे आवश्यक आहे. उमेदवार क्रियाशिल मच्छिमार असावा. उमेदवारास किमान एक वर्ष मासेमारीचा अनुभव असावा. हे प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केल्यानंतर उमेदवारास रोजगार व स्वयंराजगाराच्या संधी उपलब्ध होतात. अधिक माहितीसाठी यांत्रिकी निर्देशक, म्तसयव्यवसाय प्रशिक्षण केंद्र सातपाटी ज्ञानेश्वर भोसले ८६२४९१९११३ वर संपर्क साधावा, असे आवाहन मत्सव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी आनंद पालव यांनी केले आहे.

## वाघ कुटुंबीयांचा समाजात आदर्श

**यावल/प्रतिनिधी**



सध्या समाजात मुलगी नको, मुलगा हवा अशी स्थिती असताना, पहिली बेटी धनाची पेटी असं न म्हणता मुलगी म्हणजे खर्चाला भार, या विचाराने तिला नकोशी केले जाते आणि मुलीचा जन्मच नाकारण्याची प्रवृत्ती समाजात वाढत आहे; मात्र रावेर तालुक्यातील चिनावल येथील वाघ कुटुंबाने मुलीच्या जन्माचे स्वागत फुलाच्या पायघड्या टाकत केले असून वाघ कुटुंबीयांचे सर्वत्र कौतुक होत आहे. चिनावल येथील सुकन्या व सिद्धार्थ वाघ या दाम्पत्याला पहिलीच मुलगी झाली. सुकन्या वाघ यांनी आपल्या माहेरी १९ ऑक्टोबर रोजी कन्यारत्नाला जन्म दिला. त्यानंतर सव्वा महिन्यानंतर सुकन्या वाघ या सासरी चिनावल येथे आल्या असता त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्यासह मुलगी त्रिशा चे औक्षण करत ओवाळून फुलांच्या पायघड्या टाकत फुलाच्या वर्षावात स्वागत केले. यावेळी घरामध्ये सर्वत्र सजावट करून फुगे व फुलांचे तोरण बांधून तसेच घरामध्ये मुलींच्या नावाने गाणे लावत या मायलेकींचे स्वागत केले. मुलगी ही परक्याचे धन असते म्हणून मुलगी नको अशी मानसिकता बहुतांश दाम्पत्यांची झाली आहे; मात्र वाघ दाम्पत्याने मुलीचे अनोखे स्वागत केले आहे. मुलीच्या रूपाने घरात लक्ष्मी आली असे म्हणून तिचा गौरव देखील केला. अश्या या स्तुत्य उपक्रमा मुळे वाघ दाम्पत्याचे पूर्ण पंचक्रोशीतील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रीय महामार्गावर वाहने अडवून लुटणारे स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील टेंभुर्णी परिसरात वाहने अडवून मालमत्ता लुटणाऱ्या दोघांना सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने अटक केले असून, त्यांच्याकडून जवळपास साडे नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सोमवारी सकाळी पत्रकार परिषदेत दिली आहे. अभिजित महादेव खबाळे (वय २४ रा भाट निमगाव ता इंदापूर जि. पुणे), गणेश बबन पवार (२५), अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नांवे आहेत, तर यातील तिसरा आरोपी योगेश मल्हारी जाधव हा सध्या कारागृहात आहे. २८ जून २०२० रोजी रात्री साडे अकरा ते वाजण्याच्या सुमारास फिर्यादी प्रशांत विजयकुमार लांडगे (वय २३ रा.रेबेचिंचोळी ता.लोहारा जि.उस्मानाबाद) हे स्विफ्ट कार घेऊन एमएच १२ एजे २६०६ मधून पुणे ते उस्मानाबाद असे जात असताना कुर्डुवाडी चौक टेंभुर्णी येथे आल्यावर चोरट्यांनी मोटारसायकल वरून कारचा पाठलाग सुरू केला टेंभुर्णी ते कुर्डुवाडी असे जात असताना रस्त्यात तीन ठिकाणी त्यांची कार अडविण्याचा प्रयत्न करून आंबड जवळ आल्यानंतर कारला मोटारसायकल अडवी लावून दमदाटी करून कारचा ताबा घेऊन त्यांना वालचंदनगर ता.इंदापूर जि. पुणे येथील निर्जनस्थळी नेले चोरट्यांनी त्यांच्या जवळील रोख रक्कम मोबाईल व कारसह ९ लाख २३ हजार ५०० रुपयांचा ऐवज जबरदस्तीने नेला होता.

याप्रकरणी लांडगे यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा पोलीस उपअधीक्षक अरुण सावंत, पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पथक तयार केले. या पथकाला सदरचा गुन्हा करणारे आरोपी स्विफ्ट कार व मोटारसायकलसह टेंभुर्णी येथील ग्यानी सरदार ढाबा येथे थांबले असल्याचे गुप्त माहिती मिळाली पथकाने स्विफ्ट कारमध्ये बसलेल्या दोघांना ताब्यात घेतले त्यांच्या ताब्यातून चोरलेले स्विफ्ट कार व गुन्ह्यासाठी वापरलेली मोटारसायकल एक तलवार असा साडे नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण सावंत, पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, सलीम बागवान, पोलीस नाईक बापू शिंदे, लालसिंग राठोड, महिला पोलीस नाईक मोहिनी भांगे, पोलीस कॉन्स्टेबल अजय वाघमारे, चालक विलास पारधी यांनी बजावली आहे.

# कांदळवन अधिसूचीत करण्यासंदर्भात पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत बैठक

### हरकती व दाव्यांची चौकशी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश



**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबई उपनगर, ठाणे, पालघर व रायगड जिल्ह्यातील कांदळवन राखीव वन म्हणून अधिसूचीत करणेबाबत तसेच या जमिनीवरील हरकती व दाव्यांची चौकशी तातडीने पूर्ण करुन कांदळवनाची राखीव वन म्हणून अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करणेबाबत प्रगतीचा आढावा पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी घेतला. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीस अपर मुख्य सचिव (महसूल) नितीन करीर, प्रधान सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, प्रधान सचिव (पर्यावरण) श्रीमती मनिषा म्हैसकर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कांदळवन कक्ष) वीरेंन्द्र तिवारी, विभागीय आयुक्त (कोकण विभाग) अण्णासाहेब मिसाळ, जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) मिलिंद बोरीकर, जिल्हाधिकारी (ठाणे) राजेश नार्वेकर, जिल्हाधिकारी (पालघर) अतिरिक्त जिल्हाधिकारी (रायगड), मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय) अरविंद आपटे, उपवनसंरक्षक (कांदळवन कक्ष, मुंबई) निनु सोमराज उपस्थित होते. पर्यावरण मंत्री ठाकरे यांनी कलम ४ अंतर्गत राखीव वन म्हणून अधिसूचीत झालेल्या कांदळवनातील हरकती व दाव्यांची चौकशी १५ जानेवारी २०२१ पर्यत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच महसूल विभागाच्या ताब्यात असलेले राखीव वन तातडीने वन विभागास हस्तांतरीत करण्याची सूचना दिली. या व्यतिरिक्त एम.एम.आर. डी.ए., म्हाडा, एम.आय.डी.सी., सिडको इत्यादी यंत्रणेच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र महसूल विभागास हस्तांतरीत न करता वन विभागास हस्तांतरीत करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी आवश्यक सूचना जारी करण्यास सांगितले. विभागीय आयुक्त यांनी शासनास अंतिम अधिसूचनेसाठी पाठविलेल्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करुन अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्याचे निर्देश प्रधान सचिव (वने) यांना दिले.

या व्यतिरिक्त मिरा-भाईंदर महापालिका, वसई-विरार महापालिका, ठाणे महानगरपालिका व इतर महानगरपालिकांच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र राखीव वन म्हणून अधिसूचीत करण्यास व वन विभागास हस्तांतरीत करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त (कोकण) यांना दिले. तसेच अधिसूचीत व हस्तांतरीत कांदळवन क्षेत्राचे ताळमेळ महसूल व वन विभागाने करुन घेण्यासही सूचीत केले. वन विभागास हस्तांतरीत कांदळवनाचे संरक्षणासाठी उपाययोजना करण्याबाबतही निर्णय घेण्यात आले.

## दवणहिप्परगा येथे हुंडा बंदी दिन साजरा



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील दवणहिप्परगा येथे अंगणवाडी क्रमांक १, ३, व ४ च्या सेविकांच्या वतीने शासन निर्णयानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना देवणी अंतर्गत सोमवार दि.३० नोव्हेंबर रोजी मोठ्या उत्साहात हुंडा बंदी दिन साजरा करण्यात आला. हुंडा देने किंवा घेणे दोन्ही बेकायदेशीर आहे. हुंडा याचा अर्थ आहे जी संपत्ती, लग्नाच्या वेळी वधूच्या कुटुंबा तर्फे वर कुटुंबाला दिली जाते. हुंडा याला उर्दू मध्ये जहेज़ म्हणतात. यूरोप, भारत, अफ्रीका आणि जगाच्या अन्य भागात हुंडा पध्दतीचा मोठा इतिहास आहे. भारतात याला दहेज, हुंडा किंवा वर-दक्षिणाच्या नावाने ओळखले जाते. तसेच वधूच्या कुटुंब तर्फे नक़द किंवा वस्तूच्या रूपात हे वराच्या कुटुंबाला वधू बरोबर दिले जाते. आजच्या आधुनिक काळात हुंडा पद्धत नावाचा राक्षस सर्व दूर पसरले आहे. समाजात हुंडा घेणे-देणे कायम स्वरुपी बंद झाले पाहिजे असे या कार्यक्रमात हुंडा बंदी कायद्याविषयी मिनी अंगणवाडी कार्यकर्ती एम.जी.हमिने यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बहुतांश महिला उपस्थित होत्या.

# चौधरीवाड्यातील बहिणाई स्मृती संग्रहालयात ६९ वा स्मृतीदिन साजरा

**जळगाव/प्रतिनिधी**

बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्टतर्फे जळगाव येथील चौधरी वाड्यातील बहिणाई स्मृती संग्रहालयात बहिणाबाई चौधरी यांच्या ६९ व्या स्मृतिदिन साजरा करण्यात आले. प्रतिमा पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्टचे विश्वस्त दिनानाथ चौधरी यांच्याहस्ते बहिणाईंच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. या प्रसंगी बहिणाबाई चौधरी यांच्या नातसून पद्माबाई चौधरी, पणती प्रियंका चौधरी, शोभाबाई चौधरी, प्रिया चौधरी, वैशाली चौधरी, हितेंद्र चौधरी, मनस्वी चौधरी, राजेंद्र हरिमकर उपस्थित होते. बहिणाईंच्या परिवारातील सदस्य, चौधरी वाड्यातील सदस्यांच्या उपस्थितीत लोकशाही टिव्हीवर ऑनलाईन प्रसारीत झालेल्या 'अरे संसार संसार' कार्यक्रमसुद्धा बघितला गेला. परिवर्तन



जळगावच्या महाराष्ट्राभर गाजत असलेल्या बहिणाईंची गीते आणि कवितांची सुरेल मैफल, 'अरे संसार संसार'च्या माध्यमातून चौधरीवाड्यातील सदस्यांनी अनुभवली. दरम्यान कार्यक्रमाप्रसंगी कोरोना संदर्भातील सर्व नियमांचे पालन करण्यात आले. यशस्वीतेसाठी अशोक चौधरी, रंजना चौधरी यांनी सहकार्य केले. दिवसभर स्मृतीसंग्रहालयाला साहित्यप्रेमींनी भेटीसुद्धा दिल्यात.

जैन इरिगेशनचे संस्थापक भवरलालजी जैन यांच्या संकल्पनेतून भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाउंडेशनतर्फे जळगावच्या चौधरी वाड्यातील बहिणाबाईंच्या घराचे रूपांतर संग्रहालयात झालेले आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या रोजच्या वापरातील शेतीची अवजारं, स्वयंपाकाच्या वस्तू, भांडी, पुजेचं साहित्य ह्यांची जपवणूक केली आहे. हा अलौकिक ठेवा पुढील पिढीला पाहता येत आहे. 'अरे संसार संसार' म्हणत संसारातील सुख दुःखांच्या साक्षीदार असलेल्या अनेक गोष्टी या संग्रहालयात बघायला मिळतात.

## थोडक्यात वृत्तांत

### ८ डिसेंबरला कोकण विभागीय पेन्शन अदालत

नवी मुंबई : कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि.८ डिसेंबर २०२० रोजी सकाळी १०.३० वा. विभागीय आयुक्त कार्यालय, कोंकण भवन, (सामान्य), शाखा नवी मुंबई ४००६१४ येथे आयोजित केली आहे. सदर पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणीचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारीं असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे उप आयुक्त, (सामान्य) कोकण विभाग यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

### भादा येथील ग्रामदैवत खंडोबा यात्रा रद्द

औसा : तालुक्यातील भादा येथील खंडोबा यात्रा रद्द करण्याचा निर्णय ग्रामपंचायत आणि खंडोबा यात्रा कमिटीने घेतला आहे. गेल्या अनेक वर्षाची परंपरा असलेला हा ग्रामदैवत खंडोबा यात्रा उत्सव यावर्षी खंडोबा यात्रा उत्सव यावर्षी covid-19 या जागतिक महामारी च्या भीतीपोटी येथील होणारी चंपाषष्टी निमित्त होणारी १९ ते २१ डिसेंम्बर रोजीची होणारी खंडोबा यात्रा रद्द करण्यात आली आहे. भादा येथील ग्रामपंचायतमध्ये झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामपंचायत आणि यात्रा कमिटीच्या वतीने घेण्यात आला यावेळी माजी उपसरपंच बालाजी शिंदे, ग्रामविकास अधिकारी माणिक सूर्यवंशी,तंटामुक्त समिती अध्यक्ष सूर्यकांत पाटील, ग्राम दैवत यात्रा-उत्सव कमिटीचे अध्यक्ष जन्मेजय गायकवाड, भीमाशंकर पाटील,माजी सरपंच पांडुरंग कात्रे, रुपसेन डोलारे, अशोक गाडेकर, भागवत गायकवाड आदी उपस्थित होते.

### येणगेवाडी येथे पाण्याची तीव्र टंचाई

देवणीः तालुक्यातील मौजे देवणी (खु) ग्रुप ग्रांम पंचायत येणगेवाडी येथे गेल्या दोन महिन्यापासुन पाण्याची तिव्र टंचाई निर्माण झाली असुन याकडे संबंधित प्रशासकीय यंत्रणा कसल्याच प्रकारची दखल घेत नसल्याने ग्रामस्थांच्या वतीने अनेक वेळा निवेदन देण्यात आले. याबाबत अधिक माहिती अशी कि सरपंच पदाचा कार्यकाल संपल्यानंतर देवणी खु ग्रुप ग्राम पंचायतला प्रशासक म्हणून कांबळे यांची नेमणूक करण्यात आली, परंतु नेमणूक झाल्यापासून कांबळे नावचा अधिकारी एक हि दिवस ग्रामपंचायत ला तोंडच दाखविलाच नाही, यावर्षी अधिक प्रमाणात पाऊस काळ होऊन सुद्धा अधिकाऱ्यांच्या हेक्केखोरीमुळे देवणी खु व येणगेवाडी येथील जनतेला पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. यावर जिल्हाअधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालुन पाणी पुरवठ्याची लवकरात लवकर दखल घ्यावी अन्यथा ग्रामस्थ रस्त्यावर उतरुण अंदोलन करणार असल्याचे बोलले जात आहे.

### घरात घुसून दोन मोबाईल चोरले

भिवंडी : शहरातील कचेरीपाडा येथे राहणारे वकील हणमंत माणिक जाधव यांनी यांच्या राहत्या घरात गुरुवारी पहाटे अज्ञात इसमांनी प्रवेश करून किचनमध्ये असलेल्या फ्रिजवर ठेवलेले पाच हजार रुपये किंमतीचे दोन मोबाईल अज्ञात इसमाने चोरून नेले आहेत. याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भिवंडीत रिक्षाची चोरी

भिवंडी : पार्क करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरन नेल्याची घटना समोर आली आहे रिक्षा मालक रघुनाथ वसंत दिनकर यांनी त्यांची तीस हजार रुपये किंमतीची काळी पिवळी रिक्षा ७ मार्च ते ८ मार्च रोजी कोनगाव येथे पार्क करून ठेवली असता अज्ञात इसमाने ती चोरून नेली याप्रकरणी दिनकर यांनी गुरुवारी कोनगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### भिवंडीत विवाहितेचा छळ

भिवंडी :महिला अन्याय अत्याचाराच्या व घरेलू हिंसाचाराच्या अनेक घटना समोर येत असतांनाच मुलगी झाली म्हणून पतीने पत्नीकडून मुलीच्या संगोपनासाठी तीस हजार रुपयांची मागणी केली असता सदर रक्कम पत्नी देऊ न शकल्याने पतीने पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात गुरुवारी पतीसह सासरच्या मंडळींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिलशाद गामा मोमीन, सोनू गामा मोमीन, नौशाद मोमीन सर्व रा. शांतीनगर असे गुन्हा दाखल झालेल्या इसमाची नवे असून पती २० मार्च ते १८ मे २०२० या दोन महिन्यांच्या काळात पती दिलशाद याने आपल्या पत्नीला मुलगी झाली म्हणून मुलीच्या संगोपनासाठी ३० हजार रुपये देण्याचा तगादा लावला होता. ते न दिल्याने त्याने पत्नीचा छळ सुरु केला होता अखेर या छळाला कंटाळून विवाहितेने पतीसह दिरांवर शांतीनगर पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

### ८ हजार ७९७ दिव्यांगाना साहित्याचे वाटप

लातूर : जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी सांभळत असताना संभाजी पाटील निलंगेकर यांनी ३ डिसेंबर २०१७ रोजी जिल्ह्यातील दिव्यांगाची नोंदणी करून त्यांना उपयोगी साहित्याचे वाटप व्हावे याकरीता विशेष अभियान राबविण्याच्या सुचना प्रशासनाला दिल्या होत्या. सदर अभियान हरंगुळ येथील संवेदना सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र व जिल्हा परिषद प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमानातून व्हावे यासाठीही विशेष निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील दिव्यांगाची नोंद करण्यासाठी एक वेबसाईट विकसीत करण्यात आली होती. देशातील दिव्यांगाना विशेष सुविधा प्राप्त व्हाव्यात अशा सुचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून सातत्याने होत आहेत. त्याचा एक भाग म्हणून सदर अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या अभियानाची पुर्तता झालेली असून गेली तीन वर्ष जी मेहनत घेण्यात आली आहे त्याची फलश्रुती १० डिसेंबर २०२० रोजी होत आहे. वेबसाईटच्या माध्यमातून जिल्ह्यातील ८ हजार ७९७ दिव्यांगाची नोंद झाली असून त्यांना कोणते साहित्य आवश्यक आहे याचीही नोंद करण्यात आलेली आहे.त्यानुसार या दिव्यांगाना उपयोगी साहित्याचे वाटप केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री थावरचंद गहलोत यांच्या शुभहस्ते तर खासदार सुधाकर श्रृंगारे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.

CMYK

# महाराष्ट्र द्वेष्ट्यांना अद्दल घडवली!

पुन्हा येईन... पुन्हा येईन... अशा आरोळ्या ठोकित महाराष्ट्रात सत्ता काबीज करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपवाल्यांचे विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदार संघाच्या निकालाने अक्षरशः थोबाड फुटले आहे. धुळे, नंदुरबार स्थानिक स्वराज्य संस्थेने भटजी बुवांची लांगोटी वाचवली अन्यथा महाराष्ट्रात तोंड दाखवायला जागाउर्ली नसती. विधान परिषदेच्या ६ जागांसाठी झालेली निवडणूक महा विकास आघाडी आणि भाजप या दोघांच्याही दृष्टीने अत्यंत प्रतिष्ठेची होती. कारण या निवडणुकीत जर भाजपला मोठे यश मिळाले असते, तर महाराष्ट्रात ऑपरेशन लोटासला बळ मिळाले असते आणि फोडाफोडीचे राजकारण सुरू झाले असते. शिवाय भाजपवाले सगळीकडे सांगत सुटले असते की महा विकास आघाडीने जनाधार गमावल्याने त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. पण प्रत्यक्षात तसे झालेले नाही. धुळे, नंदुरबार स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेवर पाठवण्याचा जागेसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे अमरीश पटेल विजयी झाले. तसे पाहता हा विजय अमरीश पटेल या व्यक्तीचा होता. कारण या दोन्ही जिल्ह्याच्या राजकारणात त्यांचे वर्चस्व आहे. त्यामुळे या पूर्वी ते काँग्रेसमध्ये असतानाही जिंकले होते आणि आता भाजपामध्ये आल्यावरही जिंकले आहेत. त्यामुळे हा भाजपच्या कर्तृत्वाचा किंवा लोकप्रियता विजय आहे असे म्हणता येणार नाही. या उलट विधान परिषदेच्या पदवीधर मतदार संघाच्या तिन्ही जागा महा विकास आघाडीने जिंकल्या. यापैकी पुणे आणि नागपूर पदवीधर मतदार संघात भाजपचे वर्चस्व आहे तरी सुद्धा पुण्यातून भाजपचे संग्राम देशमुख आणि नागपूर मधून संदीप जोशी पराभूत झाले. तर औरंगाबादमध्ये पंकजा मुंडे यांचे खंदे समर्थक बोराळकर यांचा नेहमी प्रमाणे भाजपवाल्यानीच गेम केला. कारण बोराळकर यांच्यासाठी पंकजा मुंडे यांनी खूप आकडं तांडव करून उमेदवारी मिळवली होती. त्यामुळें भाजपतील दलीत आदिवासी विरोधी नाराज झाले होते आणि याच नाराजीतून बोराळकरंचा गेम करून भाजपा नेतृत्वाने पंकजा मुंडे यांना पुन्हा अद्दल घडवली. त्यामुळे या पराभवातून भाजपने नाही, तर पंकजा मुंडे हिने धडा घ्यायला हवा. पुण्यात नागपूरचे महापौर संदीप जोशी हे शंभर टक्के निवडून येणार असे नागपुरात सगळेच भटजी एक मुखाने सांगत होते. कारण ६० वर्ष हा मतदार संघ भाजपाकडे होता. पण काँग्रेसच्या अभिजित वांरजेंनी सगळ्यांचा आवाज बंद केला. नागपूरमध्ये पराभव हा नुसता पराभव नसून भाजपच्या मर्मावर झालेला घाव आहे आणि त्याची जखम सजासहजी बरी होणार नाही. महापौर संदीप जोशी यांच्या पराभवानंतर फडणवीस बुवा हे खरोखरच महाराष्ट्रात भाजपाचे नेतृत्व करण्यास लायक आहेत की नाहीत यावर केंद्रातील भाजप नेतृत्वाने गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. कारण २०१९च्या विधानसभा निवडणुकीत फडणवीस यांच्या फाजील आत्मविश्वासा मुळेच भाजपची नाव बुडाली होती. आणि पुन्हा पुन्हा जर मोदी, शहा फडणवीसांवर विश्वास टाकणार असतील तर महा विकास आघाडीचे काम आणखी सोपे होईल. म्हणूनच या पराभवानंतर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रातील भाजपा नेतृत्वाबाबत आणि खास करून फडणवीस यांच्या बाबत विचार करणे गरजेचे आहे. भाजपच्या या पराभवाची दोन प्रमुख कारणे आहेत. पहिलं म्हणजे इथल्या भाजपच्या नेत्यांनी घेतलेली महाराष्ट्र विरोधी भूमिका! सुशांत सिंग राजपूत आत्महत्या प्रकरण आणि कंगना व अर्णब प्रकरणात भाजपचे नेते मुंबई पोलिसांच्या विरोधात महाराष्ट्र सरकारच्या विरोधात गरळ ओकत होते आणि सोशल मीडियावरून मराठी माणूस त्यांची इज्जत कडित होता, तरीही भाजपवले कंगना आणि अर्णबला खांद्यावर घेऊन नाचत होते. महाराष्ट्र सर्व काही सहन करेल, पण अशी गद्दारी सहन करणार नाही. पदवीधर आणि शिक्षक मतदार संघ हे सुशिक्षित मतदारांचे मतदारसंघ आहेत आणि या सुशिक्षित लोकांना भाजपवाल्यांकडून झालेली महाराष्ट्राची बदनामी सहन झाली नाही आणि म्हणून त्यांनी या निवडणुकीत भाजपला अद्दल घडवली आहे.



# क्रांतीसुर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## संध्या स्ट्रोक

**सोनू जाधव**

ज्या देशात अनेक धर्म अनेक जाती विविध भाषा आणि त्यांना अनुरूप अशी वेगवेगळी संस्कृती आणि चालीरीती आहेत. अशा प्रचंड खंडप्राय देशाची घटना लिहण्याची किमया ज्या महान ज्ञान योग्याने साधली ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भलेही आज हयात नसले तरी त्यांनी जी सामाजिक क्रांती घडवून आणली, ती जगाच्या इतिहासात इतर कोणत्याही क्रांती पेक्षा अधिक प्रभावी होती. कारण बाबासाहेबांनी केलेल्या त्या क्रांतीने या देशात परिवर्तनाचे बीज रोवले गेले आणि त्याचा आज महान वट वृक्ष बनला आहे आणि याच वट वृक्षाच्या छायेखाली या देशातील कोट्यवधी दलीत, आदिवासी, भटके विमुक्त आणि आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उपेक्षित समाजाला हक्काची सावली आणि कायद्याचं संरक्षण मिळाले. आणि बाबासाहेबांनी हे सगळ घडवून आणले. त्यासाठी प्रस्थापितांशी संघर्ष केला. उपेक्षितांना त्यांचा न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आणि त्यांना देशाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रतिगामी मनुवाद्यां विरूद्ध जो लढा दिला तो येणाऱ्या प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. पण दुर्दैवाने आज या देशात पुन्हा एकदा मनुवाद्यानी डोकेवर काढले आहे. हिंदुत्वाचे नारे देऊन संपूर्ण हिंदू समाजाला संभ्रमित केले जात आहे. महाराष्ट्रात शाहू, फुले, आंबेडकरांनी जाती धर्माच्या पलीकडे जाऊन जी सामाजिक चळवळ सुरू केली होती, त्या चळवळीला नख लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. आरक्षणाबाबत समाजाची दिशाभूल करून जाती जातीमध्ये भिंती आणि विद्वेष निर्माण केला जातोय. त्यामुळे हे कुठेतरी थांबायला हवे. शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये दलीत मागासवर्गीयांना सवलत देण्यामागे बाबासाहेबांचा उदात असा हेतू होता. कारण माणूस शिकला तरच तो आपली प्रगती करू शकेल. त्याला स्वतःच्या पायावर उभे राहता येईल आणि पुढे नोकरी धंदा करून समाजात स्वाभिमानाने जगता येईल आणि हा त्याचा मूलभूत अधिकार आहे, पण या देशातील चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेने त्यांचा हा अधिकारच छिनुन घेतला होता. त्यामुळे पिढ्यानपिढ्या हा समाज उपेक्षित राहिला होता. या उपेक्षित समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी बाबासाहेब आयुष्यभर झटले. त्यामुळेच महाराष्ट्राला एक नवा पुरोगामी चेहरा मिळाला. पण आज महाराष्ट्राच्या त्याच पुरोगामी चेहऱ्याला पुन्हा मनुचां विकृत चेहरा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि त्याद्वारे पुन्हा एकदा महाराष्ट्राला शेकडो वर्ष मागे ढकलण्याचे प्रयत्न पद्धतशीरपणे सुरू झाले आहेत ते रोखण्यासाठी किमान महाराष्ट्रातील दलीत मागासवर्गीयांनी तरी पुढे यावे अन्यथा महाराष्ट्रात जुनाट वृढी परंपरा पुनर्जीवित होतील आणि त्यानंतर इथल्या दलीत आदिवासी आणि तळा गळतील लोकांचे जगणे मुश्किल होईल. आणि हा संभाव्य धोका लक्षात येऊनही जर त्याकडे आपले दुर्लक्ष झाले, तर येणारी आपली पिढी आपल्याला कदापि माफ करणार नाही. बाबासाहेबांनी अत्यंत कठीण काळात आणि प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन आपल्या त्या शिक्षणाचा लाभ आपल्या समाजासाठी करून दिला. त्यामुळे आज समाजाचीही जबाबदारी आहे की बाबासाहेबांनी जे मिळवून दिलं ते आपण टिकवायला हवं. केवळ बाबासाहेबांच्या जयंत्या साजऱ्या करणे आणि महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर जाऊन त्यांना अभिवादन केलं की आपली जबाबदारी संपली असे मानणे चुकीचे आहे. आणि तसा जर समाजाने विचार केला, तर बाबासाहेब आपल्याला समजलेच नाही असेच म्हणावे लागेल. आजही बाबासाहेबांनी लिहलेले मोठ ज्ञान भांडार पुस्तक रूपाने उपलब्ध आहे ते जर तरुण वर्गाने वाचलं तर सामाजिक क्रांती म्हणजे काय? आणि ती का आवश्यक आहे? तिचा सर्वसामान्य लोकांशी कसा आणि किती संबंध येतो. या सारख्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. आजची पिढी वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ आहे. त्यामुळे ती जात धर्म वृढी परंपरा यासारख्या खुळचट गोष्टींना फारसे महत्व देत नाही आणि अर्थातच हा बाबासाहेबांच्या सामाजिक क्रांतीचा आणि त्यांच्या पुरोगामी विचारांचा विजय आहे. पण या तरुण पिढीला आरक्षणाच्या माध्यमातून, धार्मिक कट्टरतेच्या माध्यमातून संभ्रमित करून चुकीच्या मार्गाने नेण्याचा प्रयत्न सुरू आहेत तो थांबवणे आवश्यक आहे. हिंदूंना मुस्लिम समाजाबद्दल आणि मुस्लिमांना हिंदू बद्दल भीती दाखवून या दोन्ही समाजाला एकमेकांच्या विरोधात उभे करण्याचे कारस्थान आखले जात आहे. त्यापासून दलीत समाजाने सावध राहणे हीच काळाची गरज आहे.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# 'प्रतिभावंत लोकलेखक अण्णा भाऊ साठे'

अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन व कार्याचे अनेक पैलू आजही सर्वसामान्यांसाठी अनभिज्ञ आहेत. एका सामान्य माणसाचा असामान्य प्रवास व इतिहास आजपर्यंत उपेक्षित राहिलेला आहे. अण्णा भाऊंची कारकीर्द व विचार यांना न्याय देणारे आणि त्यातील नवे संदर्भ उलगडून दाखविणारे लेखन महाराष्ट्रातील सुप्रसिध्द वक्ते, लेखक तथा महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य राहिलेले प्रा.डॉ.राजशेखर सोलापुरे यांनी 'प्रतिभावंत लोकलेखक अण्णा भाऊ साठे'नामक पुस्तकातून केले आहे. विसाहित्यिक, साहित्यसम्राट, सिध्दहस्त, स्वतंत्र आणि चतुःरस्त्र लोकलेखक अण्णा भाऊ साठे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. सन १९२० ते २०२० असा शंभर वर्षाचा प्रदीर्घ कालखंड उलटून गेला असला तरी अण्णा भाऊ यांच्या साहित्यातील तत्त्वज्ञान किती कालातीत आणि क्रांतिदर्शी आहे, हेच आज सिध्द होत आहे. दुर्दैव असे की, तत्कालीन मराठी समीक्षकांनी अण्णा भाऊ यांच्या साहित्याची ज्ञारशी दखल घेतली नसली तरी आज खेड्या-पाड्यातील वाचकांनी त्यांचे साहित्य अक्षरशः डोक्यावर घेतले आहे. ज्या काळात अण्णा भाऊ लेखन करत होते, तो कलावाद, रंजनवाद अशा लेखकांचा काळ होता. कल्पनारम्य लेखन करणाऱ्या लेखकांचे साहित्य आज केवळ ग्रंथालयाच्या कपाटात बंदिस्त आहे. मात्र अण्णा भाऊंचे सुधारणावादी, सत्यशोधकी, वैज्ञानिक आणि सामाजिक बांधिलकी या चार सूत्रावर आधारित अवलंबून असलेल्या साहित्याचे नव्या-नव्या आवृत्या निघत आहेत. अण्णा भाऊंचे न उलगडलेले जीवन दर्शन किंवा लेखकांच्या आजवर नजरेतून निसटलेले तात्विक चिंतन वाचकांच्या समोर प्रकट होत आहे. प्रा.डॉ.राजशेखर सोलापुरे यांनी अण्णा भाऊ यांच्या साक्षेपी विचारांना संक्षेपाने अगदी सहज, सुलभ लेखन शैलीने न्याय देण्याचा निश्चितच प्रयत्न केला आहे. 'अलोट'माणसंचे दर्शन घेणार्या आणि अणाट साहित्य लेखन करणार्या अण्णा भाऊंच्या साहित्याचे अनुशीलन करून ते आत्मसात करणे आणि त्यावर लेखन करणे, हे तसे कठीणच... परंतु डॉ. सोलापुरे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्वामुळे लेखनप्रपंच, सहज साध्य केला आहे. याविषयी ते मनोगतात म्हणतात, 'या प्रतिभावंत व्यक्तीच्या जीवन व कार्याचा तथा विचारसरणीवर लेखन करणे, हा अनुभूती आनंदाचा सोहळाच होता. तो अनुभवता आला आहे, हे विशेष'अण्णा भाऊ यांच्या कार्य-कर्तृत्वाचे जो कोणी लेखन, वाचन करेल त्याला अशीच अनुभूती आल्याशिवाय राहणार नाही. एवढे 'कालजयी'साहित्य अण्णा भाऊंचे आहे. 'प्रतिभावंत लोकलेखक अण्णा भाऊ साठे'या पुस्तकाचे अंतरंग दोन भागात विभागले आहे. भाग पहिला-अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र'तर भाग दुसरा - 'अण्णा भाऊ साठे यांचे विचारधन'या पुस्तकात एकूण १९ प्रकरणे समाविष्ट करण्यात आली आहेत. अण्णा भाऊंचे साहित्य व विचार हे एखाद्या वटवृक्षाएवढे आहे. याची जाणीव लेखकाला असल्यामुळेच दोन भागात या पुस्तकाचे लेखन केले आहे.

११ प्रकरणे ही पहिल्या विभागात आहेत. चरित्रात्मक मांडणीत अण्णा भाऊंचा जन्म, बालपण, शिक्षण वाटेगाव ते मुंबई प्रवास, कौटुंबिक जीवन, आंदोलनकर्ते, साहित्याचे निर्माते, लोकशाहीर, रशियाचा प्रवास, आयुष्याची अखेर इत्यादी घटनातून अण्णा भाऊंचे लौकीकजीवन किती कष्टप्रद होते याचा तटस्थपणे डॉ.सोलापुरे यांनी शोध घेतला आहे. मुळातच अण्णा भाऊंचे जीवन हे अग्नीकुंड होते. जीवनाचा धगधगता प्रवास होता. अत्यंत मार्मिकतेने लेखकांनी मांडला आहे. हे मांडत असताना अण्णा भाऊ हे प्रतिकूल परिस्थितीतून कसे उभे राहिले आणि अभिजात प्रतिभा लाभलेल्या अण्णा भाऊंनी मराठी साहित्याची अक्षरलेणी निर्माण केली. तब्बल २७ भाषांमध्ये त्यांचे साहित्य अनुवादित झाले. जागतिक कीर्तीचे लेखक म्हणून ते नावारूपाला आहे. परंतु आपल्या परिस्थितीची कसलीही तक्रार न करता लोकप्रबोधन करत राहिले आणि क्रांतिकारी साहित्याची पहाटच त्यांनी निर्माण केली. अशा असंख्य पैलूवर डॉ.सोलापुरे यांनी अत्यंत प्रामाणिकतेने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. चरित्रात्मक मांडणी करत असतांना लेखकांची भूमिका ही तटस्थ असते, अशा तटस्थ भूमिकेतून या पुस्तकाची सूत्रबध्द मांडणी झाली आहे. अण्णा भाऊंचे जीवन संघर्ष हे मानवी जीवन जगण्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत, हा विचार डॉ.सोलापुरे यांनी ठामपणे मांडला आहे. शालेय ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हे पुस्तक अत्यंत प्रेरणादायी आणि मागदर्शक आहे. एकंदरीत अण्णा भाऊंचे चरित्र सर्वासाठीच कसे प्रेरणादायी आहे, हेच पटवून देण्याचा अत्यंत स्तुत्य प्रयत्न केला आहे. 'अण्णाभाऊ साठे यांचे चरित्र'या भागातील आशय अभिव्यक्ती अत्यंत सरळ, सुलभ आणि प्रवाही भाषाशैलीमुळे तसेच सचित्र लेखनामुळे अण्णाभाऊंचे जीवनचरित्र वाचकांच्या नजरेसमोर ठळकपणे येते. चित्रदर्शी असल्यामुळे ते अधिकच उत्कंटावर्धक झाले आहे. त्यामुळे चरित्रात्मक भाग वाचकांच्या अधिक नजरेत भरतो. प्रतिभावंत लोकलेखक अण्णा भाऊ साठे'या पुस्तकातील भाग दुसरा 'अण्णा भाऊ साठे यांचे विचारधन'हा भाग अधिक महत्वाचा वाटतो. यात आठ प्रकरणे समाविष्ट करण्यात आले आहेत. आठही प्रकरणांच्या शीर्षकावरून अण्णा भाऊंच्या कार्य-कर्तृत्वातील 'वैश्विकता'हे मूल्य प्रकर्षाने लक्षात येते. ही आठ प्रकरणे जणू अण्णा भाऊंच्या तत्वज्ञानांची 'अष्टांगमार्ग'आहेत, हेच डॉ.सोलापुरे यांना या पुस्तकातुन पटवून द्यायची आहेत. ते त्यात यशस्वीही झाल्याचेही लक्षात येते. अण्णा भाऊंच्या विचारांचा योग्य दृष्टिकोन काय होता? त्यांचा समतोल विचार कोणता? त्यांचे समतोल लेखन, जीवनाचा योग्य मार्ग कोणता? त्यांचे कृतिशील शब्द अर्थात साहित्य कोणते? तळागाळातीलच नव्हे, तर 'माणूस'हेच केंद्रबिंदू कसे आहे? असे कितीतरी तात्त्विक विचार डॉ.राजशेखर सोलापुरे यांनी या भागातून स्वच्छ, स्पष्ट शब्दांत मांडले आहेत, हे विशेष. महात्मा गौतम बुध्दांनी सांगितलेले अष्टांग मार्गापैकी 'समतोल विचार'हा समताष्ठीत समाज रचनेसाठी तसेच तो न्यायाभिमुख आहे. कष्टकरी 'माणूस', तळागाळातील 'माणूस'हाच अण्णा भाऊंच्या समग्र साहित्याचा झरा आहे. ते, सुखी, समृध्द कसे होतील याचाच विचार अण्णा भाऊंनी साहित्यातून मांडला. महात्मा गौतम बुध्द, संत ज्ञानेश्वर, रूसो, मार्क्स, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गॉर्की यांच्या तत्त्वज्ञानातील आणि अण्णा भाऊच्या विचारातील साम्यता डॉ.सोलापुरे यांनी आधोरेखित केली आहे. अण्णा भाऊ साठे हे वास्तववादी ग्रामीण साहित्यिक होते. ग्रामीण साहित्याचा शिवार त्यांनी अत्यंत सामर्थ्यानी ङ्कुलवला. ग्रामीण लोकजीवनाचे स्वच्छ प्रतिबिंब वाचकापुढे ठेवले. कृषी-कृषकाचे बर्हिमन, बहुतांश कथा-कादंबर्यांतून चित्रित होते. 'शेती व शेतकरी' या प्रकरणात डॉ.सोलापुरे यांनी शेतकर्याच्या जीवन भणंगगाथा अण्णा भाऊंनी कशी मांडली, यांचा ते शोध घेतात. डॉ.सोलापुरे यांनी अण्णा भाऊंच्या स्त्री चित्रण सामर्थ्याचे चार स्तंभात वर्गीकरण करतात. ते चार स्तंभ असे ''वेश्या वर्गीकरण, विवाहाचा हक्क, चारित्र्यसंवर्धनाचे धारीष्ट, स्वंयनिर्णयाचा हक्क'' हे सर्व अण्णा भाऊंच्या लेखणीतून येते. स्त्री मुक्तीच्या अनेक स्तंभापैकी वरील चार स्तंभ महत्वाचेच आहेत. चिंतन या प्रकरणाचे महत्वाचे वैशिष्ट्य आधोरेखित करते. 'दारिद्र्यावर भाष्य'हे प्रकरण मुळातूनच समजून घेण्यासारखे आहे. डॉ.सोलापुरे यांचा वैचारिक लेखनाचा पिंड या प्रकरणात दिसतो. 'गरिबीचा शोध घेणारे अण्णा भाऊ हे दारिद्र्याचे संशोधक आहेत. हे सदरील लेखकाचे मत सत्य आहे.




'प्रतिभावंत लोकलेखक अण्णा भाऊ साठे'हे दोन विभागात विभागले हे पुस्तक एकीकडे अण्णा भाऊंच्या जीवन चरित्राचा प्रेरणादायी स्तंभ तर दुसरीकडे अण्णा भाऊंच्या तत्त्वज्ञानांची मीमांसा करणारा स्तंभ हे दोन्ही स्तंभ डॉ.सोलापुरे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने उभे केले आहेत. मुखपृष्ठ, मधीलपृष्ठ अत्यंत बोलके आणि आकर्षक आहेत. पुस्तकातील आशय, अभिव्यक्ती वाचकाना निश्चितच आवडणारी आणि समजणारी आहे. अण्णा भाऊंच्या जीवन कार्याची अतिशय वैविध्यपूर्ण आणि नव्याने मांडणीमुळे मराठी लेखक, वाचक, समीक्षक, संशोधक या पुस्तकाचे स्वागतच करेल यात शंका नाही. संदर्भमूल्य संग्रही असे पुस्तक सर्व स्तरापर्यंत पोहचतील या अपेक्षासह...

(संदर्भ - प्रतिभावंत लोकलेखक अण्णाभाऊ साठे)

**- डॉ.राजशेखर सोलापुरे** (९४०३५३४९९७)

# हॅकिंग म्हणजे काय रे भाऊ?

## दिशायन

हॅकर्स म्हणजे हल्ला काय करणारे होय. आपल्या कम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईलच्या सिस्टीममधली माहिती पाहतात, ती कॉपी करून नंतर त्याचा गैरवापर करतात. आपले सोशल मीडियाचे अकाऊंट हॅक करून त्यातल्या माहितीत बदल करतात, त्यांचा अजेंडा आपल्या अकाऊंटवरुन जाहीर करतात किंवा आपल्या सोशल मिडियावरील माहिती घेऊन त्यावरुन आपल्याला ब्लॅकमेल करतात.

नेमक्या शब्दात हॅकिंग म्हणजे काय सांगायचे तर आपल्याकडे असणाऱ्या इंटरनेटशी सलग्न असलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंमधील हार्डवेअर किंवा सॉफ्टवेअरमधल्या कमकूवत बाजू शोधणे. संगणक हा एकटा फार काही कामे करत नाही. नेटवर्कमुळे म्हणजे इंटरनेटने इतर कम्प्युटरशी जोडले गेल्याने आपला संगणक अनेक गोष्टी सराईतपणे करू शकतो.

संवाद साधण्यासाठी, माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी संगणकाला इंटरनेटद्वारे जगाशी जोडण्यात आले. मात्र आज जगात डिजिटल क्रांती झाली असली तरी या जोडणीत त्रुटी राहतात. त्या त्रुटी सामान्य माणसाला कळच नाहीत. पण एखाद्या संगणक तज्ज्ञाच्या लगेचच लक्षात येतील. या चुका लक्षात आलेल्या काही व्यक्तींनी त्या दुरुस्त करण्याऐवजी त्याचा फायदा घेत फसवणूक करण्यास सुरुवात केली. त्यांनाच आपण हॅकर्स म्हणतो. फक्त पैसे लुबाडणे एवढेच नाही तर राजकीय, धार्मिक विचार पसरवण्यासाठीही हॅकिंगचा वापर केला जाऊ जातो. जगातला पहिला कम्प्युटर हॅकर म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या केविन मिटनिकला १९९५ ला कॅलिफोर्नियातून अटक करण्यात आली. त्याने १९९३ पासून १०० लोकांना फसवल होते, सरकारी कागदपत्र चोरली होती, अशी माहिती बँकिंग सॉफ्टवेअर तज्ज्ञ चार्ल ऐन्स्ले यांनी नोंदवून ठेवली आहे. आपण आर्मी, सरकारी सिस्टीम्स किंवा वेबासईट हॅक झाल्याचे खूपदा ऐकले आहे. अशा अतिशय सुरक्षित व्यवस्थेच्या आत शिरून त्यातली माहिती घेणे हे सोप्पे काम नाही. संगणकामधल्या छोट्या छोट्या सगळ्या गोष्टी माहीत असणारी माणसेच हॅकिंग करू शकतात. या हॅकर्सचेसुद्धा प्रकार आहेत. हॅकिंग म्हणजे थोडक्यात फसवणे होय. माणसे त्या - त्यावेळी उपलब्ध असलेल्या साधनांच्या वापराने फसवणूक करतात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात आपण हॅकिंग हा शब्द वापरू लागलो. हॅकिंग हे पहिल्यांदा टेलिफोनद्वारे केले गेले. यात फसवणुक करणाऱ्याला हॅकर नाही तर फ्रिकर म्हणत असत. फ्रिकरबद्दल लिहिताना टोपी किंवा हॅटचा सिम्बॉल वापरतात. अर्थात ते लोकांना टोप्या घालतात हे सांगायचे असते. मुख्यत: हॅकर्सचे तीन प्रकार आहेत. पहिला प्रकार म्हणजे व्हाईट हॅक हॅकर म्हणजे एथिकल हॅकर. हे हॅकर एखाद्या सिस्टीममधे प्रवेश करून त्यातल्या त्रुटी शोधून, त्यावर काम करून तो प्रोब्लेम दुरुस्त करतात. दुसरा प्रकार म्हणजे ब्लॅक हॅट हॅकर यांना क्रॅकरसुद्धा म्हणतात. यामधे हॅकर अनधिकृतरीत्या आपल्या सिस्टीममधे घुसून त्यातली माहिती उदा नेट बँकिंगचे पासवर्ड, ट्रान्झॅक्श डिटेल्स, कामाचा डेटा, वैयक्तिक डेटा काढतात. आणि मग त्या व्यक्तीला फसवतात. तिसरा प्रकार म्हणजे ग्रे हॅट हॅकर. यात परवानगीशिवाय हॅकर सिस्टिममधे जातो आणि त्यातल्या त्रुटी शोधून सिस्टीमच्या मालकाला कळवतो. हल्ली तर कम्प्युटर एक्सपर्ट नसलेले लोकही हॅकिंग करतात त्यांना स्क्रिप्ट किडीज म्हणतात. हा गे हॅट हॅकिंगचा पहिला उपप्रकार आहे. तर दुसरा उपप्रकार म्हणजे हॅकिविस्ट होय. यात एखादी वेबसाईट, सोशल मीडिया अकाऊंट हॅक करतात. आणि त्यावरुन आपला संदेश पोचवतात. हा संदेश धार्मिक, राजकीय, सामाजिक स्वरुपाचा असतो. यामुळे लोकांच्या भावनाही दुखावल्या जातात, यावरुन वाद होऊ शकतात. यामुळे असे संदेश पाठवण्याने समाजाचे स्वास्थ्य बिघडते. याला हायजॅकिंग असेही म्हणतात. हॅकरने हायजॅक केल्यावर तो आपला संदेश आणि कोण आहे ही खूण सोडून जातो. शेवटी माणसेच त्यांच्या ज्ञानाचा वापर चांगल्या की वाईट कामासाठी करायचा ते ठरवतात. तसेच हॅकिंगचा वापर हा चांगल्या कामासाठीही होऊ शकतो. म्हणून हॅकिंगचे सरकारमान्य कोर्स जगभरात चालतात. चांगल्या, नैतिक कामासाठी हॅकिंग कसे करायचे हे या कोर्समधे शिकवले जाते. हॅकिंग आणि सायबर क्राईममधे फरक आहे. हॅक करून पैशांची फसवणूक करता येते. पण इंटरनेट सुरक्षेमुळे असं करणे सहज शक्य होत नाही. अशावेळी सुरक्षेच्या भोवऱ्यात राहूनच समोरच्या माणसाची फसवणूक केली जाते. त्याला सायबर क्राईम असे म्हणतात. हॉटेलांमध्ये एटीएमने म्हणजे डेबिट कार्डने पेमेंट केल्यावर जास्त पैसे ट्रान्सफर होणे, ऑनलाईन ट्रान्झॅक्शन, बँकिंग पासवर्ड, फोन नंबर इत्यादी माहिती चोरून ती वापरणे हे सगळे सायबर क्राईमचे प्रकार आहेत. आपल्याकडे असलेल्या कॉपी राईटच्या किंवा कामाच्या फाईल चोरून दुसऱ्यांना देणे हा वैयक्तिक फायद्यासाठी केलेला गुन्हाही सायबर क्राईममधेच मोडतो. सायबर क्राईम किंवा हॅकिंग करणारा माणूस सापडला तर भारतात इनफॉरमेशन अँड टेक्नॉलॉजी ॲक्टअंतर्गत कारवाई होऊ शकते. आपला संगणक वायरस फ्री राहावा यासाठी आपण अँटीवायरस टाकतो. आपल्या कमकूवत सिस्टीममुळे किंवा आपल्या चुकीमुळे आत शिरणारा हा वायरस म्हणजे एक कोड असतो. आत आल्यानंतर कम्प्युटरच्या प्रोग्रॅम, फाईल्सशी तो कनेक्ट होतो. त्यामुळे बऱ्याचदा आपला डेटा गायब होतो, फंक्शन्स नीट चालत नाहीत. काही लोक याचा फायदा घेऊन आपली सिस्टीम हॅक करू शकतात. हॅकिंगपासून बचावण्यासाठी अँटीवायरसप्रमाणे अँटी हॅकिंग सॉफ्टवेअरही इंस्टॉल करता येते. त्याचबरोबर आपण सिक्युरीटी अपडेट्सही टाकून घेऊ शकतो. हे इंजिनियरकडून करून घेता येईल, असं आयटी तज्ज्ञ स्वरुप दांडेकर यांनी सांगितले. कधीही आपल्या सिस्टीमच्या म्हणजे कम्प्युटर, मोबाईल, लॅपटॉप नव्याने सुरु करताना वेरिफेक्शनच्या दोन स्टेप्स ठेवा. आपले सर्व पासवर्ड किमान सहा महिन्यांनी बदला. पासवर्ड म्हणून आपला मोबाईल नंबर, नाव, वाढदिवस इत्यादी ठेवू नका. तसेच आपली पर्सनल माहिती थोडक्यात द्या. वायफाय कनेक्ट करताना प्रायेवट नेटवर्कच निवडा असे काही मोलाचे सल्लेही दांडेकर यांनी दिला आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

07 DEC TO 13 DEC 2020 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 05/12/2020 8:40 PM Page 1



# महेंद्री जंगल संवर्धन राखीव क्षेत्र, वन पर्यटन क्षेत्र करण्यासाठी आमदार देवेंद्र भुयार यांचा पुढाकार

**वरुड/प्रतिनिधी**

वरुड तालुक्यातील सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या महेंद्री जंगलाला राखीव संवर्धन क्षेत्र तसेच वनपर्यटन क्षेत्र म्हणून मंजुरी दर्जा देण्याची मागणी आमदार देवेंद्र भुयार यांनी वनमंत्री संजय राठोड यांच्याकडे केली आहे. त्यामुळे वरूड तालुक्याच्या वनवैभवात भर पडनार आहे.



वरूड वनपरिक्षेत्राचे १० हजार २०० हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र आहे. या जंगलालगत सातपुड्याच्या डोंगररांगा आहेत. वर्धा डायव्हर्शन सुपर एक्सप्रेस कॅनाल तसेच शक्ती, जीवना, चुडामणी, सोकी नद्या याच पर्वतातून तालुक्यात प्रवाहित होतात. भेमडी, झटामझिरी, शेकदरी, नागठाणा-१, नागठाण २, सातनूर, पुसली, वाई, पंढरी मध्यम प्रकल्प, पंढरी प्रकल्प असून, वाघ, बिबट, अस्वल, रोही, हरिण, रानडुकरांसारखे प्राणी या जंगलात आहेत. अनेक पक्षी, फुलपाखरांच्या प्रजाती आहेत. वनौषधी परिसर असून या जंगलामध्ये अनेक प्रकारची वृक्षे आहेत. १०८ वर्षाचे ऐतिहासिक विश्रामगृहसुद्धा आहे. यामुळे महेंद्री जंगलाला राखीव संवर्धन क्षेत्र तसेच वनपर्यटन क्षेत्र म्हणून मंजूर करावे अशी मागणी आमदार देवेंद्र भुयार यांनी वानमंत्री संजय राठोड यांच्याकडे केली आहे.

महेंद्री जंगलाला जंगल संवर्धन राखीव क्षेत्र तसेच वन पर्यटनक्षेत्र म्हणून मंजुरीदेण्यासाठी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी वन मंत्री संजय राठोड यांच्याशी मंत्रालयात बैठक घेऊन महेंद्री जंगल संवर्धन राखीव क्षेत्र, वन पर्यटन क्षेत्र करण्यासाठी सकारात्मक चर्चा करण्यात आली महेंद्री जंगलाचे वैभव, दुर्मीळ वनौषधी, वन्यजिवांची रेलचेल बघता, महेंद्री जंगल संवर्धन राखीव क्षेत्र तसेच वन पर्यटनक्षेत्र म्हणून मंजूर करण्यात येणार आहे. तसेच महेंद्री जंगल हे पाणी देणारे जंगल असून महेंद्री तलावाचे भविष्य याच जंगलावर अवलंबून आहे. या परिसरात नागठाणा तलाव, वाई तलाव, जामगाव तलाव, पंढरी तलाव, एकलविहिर तलाव, शेकदारी तलावांचा महेंद्री जंगलात समावेश आहे. जंगलात असणाऱ्या जैवविविधतेमुळे वन्यजीवप्रेमी या जंगलाचे संवर्धन होण्याची अपेक्षा अनेक वर्षापासून बाळगून आहेत. त्यांच्या स्वप्नाची पूर्तता आता होण्यास मदत होईल. वरूड तालुक्यातील महेंद्री जंगलास जंगल संवर्धन राखीव क्षेत्र तसेच वन पर्यटनक्षेत्र म्हणून मंजुरी देण्यासाठी वनमंत्री संजय राठोड, आमदार देवेंद्र भुयार यांनी पुढाकार घेतला असून महेंद्री जंगल संवर्धन राखीव क्षेत्रासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश बैठकीमध्ये देण्यात आले. त्यामुळे येत्या काळात महेंद्रीचे जंगल संवर्धन राखीव क्षेत्र , वन पर्यटन क्षेत्र, म्हणून नावारूपास येणार आहे.

पर्यावरण, वने आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी महेंद्रीचे जंगल हे संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत वनमंत्री संजय राठोड आमदार देवेंद्र भुयार यांनी याबाबत मंत्रालयमध्ये बैठक घेऊन आढावा घेतला. यावेळी आमदार देवेंद्र भुयार यांनी महेंद्री जंगलाचे वैशिष्ट्ये, वनसंपदा, जलस्त्रोत, वन्यजिवांचा वावर, क्षेत्रफळ याविषयी वनमंत्री संजय राठोड यांना माहिती देऊन महेंद्रीचे जंगल संवर्धन राखीव क्षेत्र तसेच वन पर्यटनक्षेत्र म्हणून मंजूर करण्याची मागणी आमदार देवेंद्र भुयार यांनी केली आहे.

# महिलांना आर्थिक बाबी सक्षम करण्याचा वसा रसिका क्रेडिट को ऑप सोसायटीने घेतला -अभिजीत देशमुख




**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील गोरगरीब गरजू महिलांना लघु उद्योगासाठी कर्ज देऊन महिलांना आर्थिक बाबी सक्षम करण्याचा वसा रसिका क्रेडिट को.ऑप. सोसायटीने घेतला आहे. यांच्या माध्यमातून सामजिक शैक्षणिक ऋण परत फेड करण्याचे काम गोविंदराव भोपणीकर करीत आहेत असे प्रतिपादन कांग्रेसचे युवा नेते अभिजीत देशमुख यांनी देवणी येथील बचत गटांच्या महिलांना कर्ज वाटप कार्यक्रमांत केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसिका समूहाचे सर्वे सर्वा गोविंदराव भोपणीकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस युवा नेते अभिजित देशमुख दिशा या सामाजिक संस्थाचे अध्यक्ष सोनू डगवाले अण्णा साहेब आर्थिक महामंडच्या संचालिका वैशाली यादव उपस्थित होत्या. या प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते बचत गटांच्या महिलांना चार लाख चाळीस हजार रुपये कर्ज वाटप करण्यात करण्यात आले. ग्रामीण भागातील महिलांना अभिजित देशमुख यांनी सविस्तर असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन भोपणीकर यांनी केले. या प्रसंगी वैशाली यादव, सोनू डगवाले यांचेही मार्गदर्शन झाले अध्यक्षशीय भाषणात गोविंदराव भोपणीकर आपल्या कार्याचा सविस्तर आढावा दिला. या कार्यक्रमास कुशावर्ता बेळेसह महिलां मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# डहाणू आदिवासी प्रकल्प यांच्या मार्फत खावटी अनुदान योजना महासंपर्क अभियानाचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**

कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे राज्यात उद्भवलेल्या अर्थिक संकटाच्या काळात अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना सहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजनेचे पुर्नज्जीवन राज्य शासनाने केले आहे. खावटी अनुदान योजनेमध्ये पात्र लाभार्थानी भरावयाचे अर्ज प्रकल्प कार्यालय डहाणू यांच्याकडून ग्रामपंचायत आणि नागरी भागासाठी गठीत केलेल्या समितीकडे देण्यात येत आहेत त्या समितीमध्ये तलाठी, ग्रामसेवक, कृषिसेवक, डाकसेवक, शिक्षक आणि प्रकल्प कार्यालयाचा प्रतिनिधी आहे. अनुसूचित जमातीच्या कुटुंबाला खावटी योजनेचा लाभ लवकरात लवकर मिळावा आणि कागदपत्रांची पुर्तता लवकर व्हावी या उद्देशाने डहाणू प्रकल्प कार्यालयाने यापुर्वी ग्रामपंचायतीमध्ये खावटी अनुदान योजना महासंपर्क अभियानाचे आयोजन केले होते.

त्याचप्रमाणे दिनांक ०१ ते ०४ डिसेंबर २०२० या कालावधीत खावटी योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी तसेच कागदपत्र अपुर्ण राहिलेल्या ,लाभार्थ्यांनी खावटी अनुदान योजनेचा लाभ घेण्यासाठी खाली दिलेल्या निकषाप्रमाणे आदिवासी बांधवांनी आपल्या ग्रामपंचायतीमध्ये येणाऱ्या शासकिय कर्मचाऱ्यांशी संपर्क करून अनुदानाचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावे. कागदपत्रांची पुर्तता करून अर्ज परिपुर्ण करून घ्यावा. सदरच्या अभियानासाठी प्रकल्प कार्यालय डहाणू यांचेकडुन १२०० अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरची योजनेचे पात्र लाभार्थी निवड लवकरात-लवकर पुर्ण करावयाची असल्याने तसेच पात्र लाभार्थी वंचित राहू नये यासाठी या कालावधीत पात्र लाभार्थ्यांनी परिपुर्ण कागदपत्रासह अर्ज भरणे आवश्यक आहे.

मनरेगावर १ दिवस कार्यरत असलेला आदिवासी मजूर (०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या कालावधीत), आदिम जमातीतील सर्व कुटुंबे, पारधी जमातीतील सर्व कुटुंबे, भुमिहिन शेतमजूर, परितक्तुता, घटस्पोटीत महिला, विधवा, कुमारी माता, अपंग व्यक्ती असलेले कुटुंब व अनाथ मुलांचे संगोपन करणारे आदिवासी कुटुंब, वैयक्तिक वनहक्कधारक कुटुंबे. तरी खावटी अनुदान योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अनुसूचित जमातीच्या कुटुंबानी खावटी अनुदान योजना महासंपर्क अभियानामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन डहाणू प्रकल्पाच्या प्रकल्प अधिकारी आशीमा मित्तल यांनी केले.

# ‘संविधान दिन’ साजरा

जळगावः येथील अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ७१ वा संविधान दिन साजरा करण्यात आला. ऑनलाईन पद्धतीने शिक्षकांनी संविधान दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजून सांगितले. यातून विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर व जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांना सकाळी ११ वाजेला संविधान दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्याची पुर्वकल्पना शिक्षक प्रविण चिमणकर यांनी दिली. नियमित ऑनलाईन वर्ग संपल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना गुगल फार्म पाठवून त्याद्वारे लिंक पाठवण्यात आली. सुरूवातीला प्रविण चिमणकर यांनी प्रास्ताविक मांडून संविधान दिवसाचे महत्त्व समजावले. शिक्षिका वंदना मार्कड व शिक्षिका हर्षा वाणी यांनीही संविधान दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले व माहिती दिली.

# लाखोंच्या घरफोड्या करूनही गब्बर भिकारीच पुन्हा अडकला भिवंडी पोलिसांच्या जाळ्यात!

**भिवंडी/अभिजित हिरे**



लाखोंच्या घरफोडीच्या अनेक गुन्ह्यात सहभाग असलेल्या ‘गब्बर’ नावाचा सराईत घरफोड्याने दोन साथीदारांसह भिवंडी तालुक्यातील भूमी इंडस्ट्रियल मधील कृष्णा फॅब्रीक्सच्या गोदामातून ७ लाख ६८ हजार रुपयांचे सोफ्याकरिता लागणारे कापडाचे वेगवेगळ्या कंपनीचे रोल एका टेम्पोत भरून लंपास केले होते. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात जबरी घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी गब्बर उर्फ अजय हरिजन (वय, ३५, रा. एरोली, नवीमुंबई) मोहम्मद इरफान जैनुलआबिदिन शेख (वय, २७,रा, वडाळा मुंबई) संतोष खरात (वय, ३८, रा. एरोली, नवीमुंबई) असे लाखोंच्या घरफोडी अटक केलेल्या आरोपींचे नावे आहेत. या आरोपी त्रिकूटाकडून चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमालासह टेम्पो जप्त करण्यात आला आहे. तर अनेक लाखोंच्या घरफोड्या करूनही ‘गब्बर’ भिकारीच राहिल्याने तो पुन्हा पोलिसांच्या जाळ्यात अडकल्याची माहिती तपास पथकाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. घरफोडीचे गंभीर स्वरूप पाहता सहायक पोलीस आयुक्त प्रशांत ढाले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणपत पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय अभिजित पाटील, नितीन सूर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक जे. आर. शेरखाने, यांच्यासह पोलीस पथकाने तपासला गती देत, चोरी झालेल्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक टेम्पो त्या दिवशी जाताना दिसला, या टेम्पोच्या नंबरवरून पोलीस घरफोड्या ‘गब्बर’ व त्याच्या साथीदारांपर्यत पोचवली आणि त्याला बेड्या ठोकल्या. घरफोडीच्या गुन्ह्यात अटक झालेला गब्बर काही दिवसापूर्वीच जेल मधून सुटला होता. त्यांनतर त्याने पुन्हा लाखोंची घरफोडी करण्यासाठी दोन साथीदारासह कट रचला होता. त्यानुसार २८ नोव्हेंबर रोजीच्या रात्रीच्या सुमारास कृष्णा फॅब्रीक्सच्या गोदामात साठवलेल्या महागड्या मुद्देमालावर डल्ला मारला होता. विशेष म्हणजे गब्बर हा घरफोडीतील सराईत गुन्हेगार असून तो मूळचा उत्तरप्रदेशच्या बनरासचा रहिवाशी असून त्याच्यावर अनेक घरफोडीचे जबरी गुन्हे दाखल असल्याची माहिती भिवंडी पोलीस परिमंडळचे पोलीस उप आयुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे.



# पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मंद्रुप पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा गौरव

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीत कमीतकमी किंमतीत सोने देण्याच्या प्रकरणांतून दरोडा टाकलेल्या दोन घटना मधील आरोपींना चोवीस तासांच्या आत जेरबंद केल्याबद्दल मंद्रुप पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांचा सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. महिन्यापूर्वी अंत्रोळी व औराद येथे कमीतकमी किंमतीत सोने देतो म्हणून युवकांना बोलावून घेऊन त्यांना लुटल्याबद्दल या दोन्ही गुन्ह्यातील सर्व आरोपींना वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मंद्रुप पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे व पोलीस उपनिरीक्षक गणेश पिंगुवाले यांनी व तसेच पोलीस कर्मचाऱ्यांनी तांत्रिक तपासाच्या आधारे चोवीस तासात शिफातीने अटक केली आहे. या मोठ्या कारवाईची दखल घेत पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे, पोलीस उपनिरीक्षक गणेश पिंगुवाले, पोलीस हेड कॉन्स्टेबल आबासाहेब मुंडे, भरत चौधरी, विश्वास पवार, अबू ताहेर शेख, अमोल वाघमारे, यशवंत कलमाडी, महानतेश मुळजे, किरण चव्हाण, चंद्रकांत सुतार, ओंकार व्हनमाने, संजय कांबळे, रवी हाटकीळे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

# दोन कारवाईत आठ किलो गांजासह दहा लाख रोख व दोन तलवारी जप्त

**भिवंडी/अभिजित हिरे**

भिवंडी शहरात अमली पदार्थाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर फैलावला असून त्यामुळे शहरातील गुन्हेगारी घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे प्रकर्षाने जाणवत आहे. या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भिवंडी शहरातील शांतीनगर पोलीस ठाणे व भिवंडी गुन्हे शाखा युनिट २ यांनी बुधवारी रात्री दोन वेगवेगळ्या कारवाईत सुमारे ८ किलो गांजा, दहा लाख रोख रक्कम व दोन तलवारी हस्तगत केल्या आहेत.एकाच दिवशी दोन कारवाया झाल्याने अमली पदार्थ विक्रीतील आरोपीं मध्ये खळबळ माजली आहे. पहिल्या गुन्ह्यात गुन्हे शाखे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांना खबऱ्या मार्फत शांतीनगर भागातील गायत्री नगर येथील रिजवान खुर्शीद खान (वय २४) याच्या घरात घातक शस्त्र ठेवल्याची माहिती मिळाल्यावर पो. उपनिरी शरद बरकडे, सहा.पो. उपनिरी रामसिंग चव्हाण, अनिल शिरसाठ, रविंद्र पाटील, आर.डी.अल्हाट, मंगेश चौधरी, विरेंद्र कुंभार या पोलीस पथकाने संशयित इसमाच्या घरी छापा मारला असता घरात दोन धारदार तलवारी आढळून आल्याने घराची कसून झडती घेतली असता घरात ३ किलो २५० ग्रॅम वजनाचा गांजा हस्तगत केला असून आरोपी व सदरचा गुन्हा गुन्हे शाखेने शांतीनगर पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केला आहे .



तर शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजा माफियांची टोळी कार्यरत असून त्यांच्या मार्फत शहरात सर्वत्र गांजा विक्री करीत असल्याची माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांना मिळाली असतात्यांनी पोलिसांना शहरातील अनधिकृत अमली पदार्थाच्या विक्रीस पायबंद घालण्याचा सक्त सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले, वरिष्ठ पो.निरीक्षक शीतल राऊत, पो.निरीक्षक किरण कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. कैलास टोकले, सहा.पो.उपनिरीक्षक भोला शेळके, कर्मचारी तुषार वडे, डी के दळवी, अमोल इंगळे, जितेंद्र पाटील, ज्ञानेश्वर कापरे, रवि पाटील या पोलीस पथकाने शांतीनगर, केजीएन भाजी मार्केट येथून अब्दुल कादर अब्दुल जब्बार शेख (वय ४६), अकबर हुसेन अब्दुल अजीज शेख (वय ४५) दोघे राहणार शांतीनगर यांना ताब्यात घेऊन त्यांच्या घराची झडती घेतली असता त्यांच्या जवळून ४ किलो ९७० ग्रॅम वजनाचा ४९ हजार ७०० रुपयांच्या गांजा सह रोख १० लाख २२ हजार २७० रुपये रोख रक्कम व अकरा हजार किंमतीचे दोन मोबाईल असा १० लाख ८२ हजार ९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात शांतीनगर पोलीस यशस्वी झाले आहेत. भिवंडी शहरात शांतीनगर भागात एकाच दिवशी शांतीनगर पोलीस व भिवंडी गुन्हे शाखा युनिट २ या दोन्ही पोलीस ठाण्यांनी कारवाई करीत तब्बल ८ किलो गांजा जप्त करण्यात यश मिळवले आहे. त्यामुळे शहरातील अमली पदार्थ विक्री व्यवसायातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. तर शहरात अमली पदार्थ विक्री बाबत नागरीकांनी पुढे येऊन तक्रारी कराव्यात पोलीस त्यांची तात्काळ दाखल घेऊन कारवाई करतील अशी माहिती पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी दिली आहे.

जा.क्र. कृ.उ.बा.स.देवणी/गाळा, नामांतर/२४१/२०२०
कार्यालय : कृषी उत्पन्न बाजार समिती, देवणी
दिनांक : ०१/१२/२०२०

**कृषी उत्पन्न बाजार समिती, देवणी, ता.देवणी, जि. लातूर**

**जाहीर प्रगटन**

कृषी उत्पन्न बाजार समिती, देवणी (बु)च्या सर्व अनुज्ञप्तीधारक व्यापाऱ्यांना कळविण्यात येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती, देवणी मार्केट यार्डातील गाळा नंबर १२ साईज २०x१० फूट श्री. शंकर नागप्पा बिराजदार अ वर्ग खरेदीदार देवणीच्या नामांतरासाठी अर्ज आलेला असन सदरील गाळा नंबर १२च्या दक्षिणेस व उत्तरेस रोड व पुर्वेस गाळा नंबर ११ श्री. रामलिंग त्र्यंबकअप्पा नीला व पश्चिमेस गाळा नंबर १३ श्री. मुजीब वहाबसाब उंटवाले यांचा गाळा आहे. हा गाळा यापुढे न्यू ओम साई ट्रेडिंग कंपनी प्रो.प्रा.श्री. अनिल वसंत डोंगरे या नावावर नामांतर करावयाचा आहे.

सदरील गाळा नंबर १२ वर कोणाचे काही उजर अथवा देणे-घेणे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्धी झालेल्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांत संपूर्ण कागदपत्रांसहित मे. सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, देवणी यांच्याकडे सादर करावे.

सदरील (१५) दिवसात उजर नाही आल्यास कोणाचीही काहीच हक्क संबंध नाही, असे समजून या गाळाचे नामांतराची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर कोणाची कसलीच तक्रार चालणार नाही.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

| सही/- | सही/- |
| --- | --- |
| प्र.सचिव | सभापती |
| श्री.सुनील अशोकराव कळसे | श्री.बालाजी दत्तात्रय बिरादार |

**कृषी उत्पन्न बाजार समिती, देवणी, ता.देवणी, जि. लातूर**

# घरफोडया करणारा अट्टल गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात!

**लातूर/अमर करकरे**

रेणापूर तालुक्यातील मुरढव येथे दीड महिन्यापूर्वी झालेल्या घरफोडीतील आरोपीस लातूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले असून त्याच्या ताब्यातून दागिन्यांसह रोख रक्कम असा १ लाख १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत दमदार कामगिरी केली आहे. याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, रेणापूर येथील धनराज गोविंदराव देशमुख (वय वर्ष ३५) यांच्या घरी दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजी दुपारच्या सुमारास चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना घडली होती. या घरफोडीत चोरट्लयांनी मारीतील रोख रक्कम १ लाख रुपये व दागिने असा एकूण १ लाख ६३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. याप्रकरणी रेणापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी लातूरचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करून गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांनी पोलिसांचे पथके स्थापन करून तपास सुरू केला असता एका खबऱ्या मार्फत सदरील घटनेतील चोरी प्रदीप ऊर्फ बाळू अरविंद अहिलवाड राहणार मुरढव यांनी केल्याची माहिती मिळाली. त्यावरून आरोपीचा शोध घेऊन मुरढव येथून आरोपीला ताब्यात घेतले आणि अधिक विचारपूस केली असता त्यांनी घरफोडी केल्याची कबुली पोलिसांना दिली. त्याच्या ताब्यातून चोरीस गेलेला मुद्देमालापैकी १० ग्राम सोन्याचे दागिने किंमत ५० हजार रुपये चांदीचे दागिने किंमत ९ हजार रुपये रोख रक्कम ४२ हजार ७०० रुपये असा एकूण १ लाख १ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस रेणापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, पोउनि. लक्ष्मण कोमवाड, पोह. संजय भोसले, पोना.रामहरी भोसले, प्रकाश भोसले चापोह. सचिन मुंडे यांनी केले.




## पान १ वरून....

### बेफिकीर आयुक्तांमुळे वसई विरारकरांच्या ...

असलेल्या तडीपार गुंडांची प्रचंड दहशत आहे. पालिका आणि पोलीस आमच्या खिशात आहेत असे सांगून या लोकांनी नैसर्गिक नाल्यांवर, गटारांवर, तलाव बुजवून नैसर्गिक पाण्याचे श्रोत बंद करून मिळेल तिथे चाळी बांधल्यात. सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांवर केलेल्या अनधिकृत बांधकामांमुळे नाले चॉकअप झालेत. परिणामी पावसाळ्यात नालासोपाराचा तसेच विरारचा बराचसा भाग पाण्याखाली जातो. जर अतिवृष्टी झाली वसई विरार मधील सखल भाग पूर्णपणे पाण्याखाली बुडून झोपड्यात तसेच बैठ्या चाळीत राहणारे हजारो लोक बुडून मरतील. मग त्याची जबाबदारी कोणावर? पालिका प्रशासन भूमाफियांकडे का दुर्लक्ष करीत आहे तेच कळत नाही. कामण येथील चाळमाफिया हसरत शेख, अनिल गुप्ता, पप्पू गुप्ता, चिंचोटीतील प्रकाश उर्फ राजू राठोड, पेल्हार मधील समशेर, शहजाद पेल्हारच्या रिचर्ड कंपाऊंड मधील कमरुद्दीन, शमशाद भाय आणि धुमाळ नगर मधील भूमाफिया यांनी उच्छाद मांडला आहे. पालिका प्रशासन या भूमाफियांवर का कारवाई करीत नाही. बरे या अनधिकृत बांधकामाचे पुरावे देण्यासाठी काही पत्रकारांनी फोटो काढण्याचा प्रयत्न केला असता भूमाफियांनी महिलांच्या जमावाला पुढे करून त्या पत्रकारांवर हल्ला करायला आणि त्यांच्या विरुद्ध खोट्या विनयभंगाच्या तक्रारी करायला लावल्या. यावरून या परप्रांतीय भूमाफियांची किती हिम्मत वाढलीय याचा अंदाज येतो. पालिकेचे जे सहाय्यक आयुक्त आहेत ते काय करतात. त्यांना जनतेच्या पैशातून पगार मिळतो, पण आज भूमाफियांच्या अनधिकृत बांधकामांमुळे इथल्या नागरी सुविधांवर ताण येतो हे सहाय्यक आयुक्तांना दिसत नाही का? ते गप्प का? आणि त्यांना गप्प राहण्याचे भूमाफियांकडून किती पैसे मिळतात? असा सवाल वसई जनता करीत आहे. तर पालिका आयुक्त गंगाथरन डी. हे जणू काही नामधारी पालिका आयुक्त असल्यासारखे डोळे मिटून बसलेत. त्यामुळे आता नगरविकास खात्यानेच याची दाखल घेऊन या भूमाफियांच्या आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या पालिका प्रशासनावर कारवाई करावी अशी मागणी इथल्या जनतेने केली आहे.

### पोलीस मित्रामुळे संसार उध्वस्त ...

त्याची बदली श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशनला झाली होती. बदलीचे आदेश मिळताच विशालने लागलीच पत्नी सोनाली, मुले साईश्वर अन् वेदिका यांच्यासह नियुक्तीच्या जागी आपला संसार हलवला. तो लागलीच श्रीरामपुर तालुका पोलिस स्टेशनला वरिष्ठांना मानवंदना देत हजर झाला. श्रीरामपूर येथील म्हाडा पोलिस लाईनमधे तो रहात होता. या पोलिस लाईन मधील रहिवास त्याच्यासाठी दुर्दैवी ठरला. या ठिकाणी त्याची ओळख विशाल खंडागळे या पोलिस कर्मचाऱ्यसोबत झाली. विशाल हापसे आणि विशाल खंडागळे हे दोघे विशाल पोलिस कर्मचारी एकाच पोलिस लाईनमधे रहात होते. दोघे एकाच खात्यात नोकरीला होते. त्यामुळे सरळ स्वभावाच्या विशाल हापसे याने अविवाहीत विशाल खंडागळे याच्याशी मैत्री केली व विश्वास टाकला.

अधुनमधून अविवाहीत विशाल खंडागळे याचे विवाहीत विशाल हापसे याच्या घरी जाणे येणे सुरु झाले. येथेच विशाल हापसेच्या दुर्दैवाचा फेरा सुरु झाला. विशाल हापसे यास छिचोर वृत्तीचा शेजारी विशाल खंडागळे याच्या रुपाने मिळाला होता. विशाल खंडागळे याच्याशी मैत्री केल्यानंतर विशाल हापसे याची मानसिक शांतता भंग पावली. अविवाहीत विशाल खंडागळे याची नजर विशाल हापसे याची पत्नी सोनालीवर पडली होती. दोघांची नजरानजर होण्यास आणि मैत्री होण्यास वेळ लागला नाही. विशालची पत्नी सोनाली देखील कळत नकळत पोलिस लाईन मधे राहणाऱ्या अविवाहीत विशाल खंडागळे कडे आकर्षीत झाली होती. वास्तविक सोनाली ही एक विवाहीता होती. तिचा पती विशाल हापसे हा एक सरळमार्गी पोलिसकर्मी होता. मात्र तिला पती विशालपेक्षा घराजवळ कॉलनीत राहणारा तो विशाल जवळचा वाटत होता. तिने त्या विशालला प्रियकर मानले होते. पती विशाल व प्रियकर देखील विशाल मात्र तिला त्या विशालमधे जास्त जवळीकता वाटली होती. आता पोलिस खाते म्हटले म्हणजे केव्हा, कुठे व कशी ड्युटी लागेल हे काही सांगता येत नाही. सुटी मागीतली म्हणजे लवकर मिळत नाही. असे असले तरी विशाल हापसे जी ड्युटी मिळेल ती विनातक्रार करत असे. त्याच्या याच स्वभावाचा गैरफायदा विशाल खंडागळे याने घेण्याचे ठरवले. पती विशाल समोर असला म्हणजे सोनाली नाममात्र त्याची रहात होती. मात्र पती विशाल नोकरीला गेला म्हणजे ती प्रियकर विशालची होत असे. विशाल हापसे याची दोन्ही मुले लहान होती. मात्र त्याचा मोठा मुलगा साईश्वर याला काही प्रमाणात आई सोनालीच्या हालचाली कळत होत्या. विशाल हापसे कधी एकदा नोकरीला जातो व त्याच्या नोकरीच्या वेळेत कधी आपल्याला रिकामा वेळ मिळतो याची विशाल खंडागळे अधाशासारखी वाट बघत असे. जेव्हापासून विशाल हापसे लोणी पोलिस स्टेशनमधून श्रीरामपूर तालुका पोलिस स्टेशनला बदलून आला होता, तेव्हापासून विशाल खंडागळे याची नजर त्याची सोनालीवर खिळून बसली होती. एके दिवशी विशाल हापसे याची बंदोबस्तकामी ड्युटी लागली. नेमकी ही संधी साधून संधीसाधू विशाल खंडागळे हा मुद्दाम सिक मधे गेला. बंदोबस्तकामी आपली देखील ड्युटी लागणार हे विशाल खंडागळे यास अगोदरच कुणकुण लागली होती. त्यामुळे त्याने अगोदरच सिक लिव्हवर जाण्याची तयरी करुन ठेवली होती. सिक लिव्ह घेतल्यानंतर खंडागळे म्हाडा पोलिस लाईनमधील घरीच थांबला. हापसे ड्युटीवर रवाना होताच सोनालीने तिच्या दोन्ही मुलांना बाहेर काहीतरी कामानिमित्त बाहेर पाठवून दिले. आता ग्रीन सिग्नल असल्याचे समजताच कानोसा घेत घेत खंडागळे याने हापसेच्या घरात प्रवेश केला. त्यादिवशी दोघे जीव एका खोलीत बंद झाले होते. दोघांनी आपली सर्व प्रकारची तगमग शांत करुन घेतली. त्यानंतर जणू काही झालेच नाही अशा अविर्भावात खंडागळे बाहेर येत आपल्या खोलीत निघून गेला. एकाच खात्यात नोकरीला असलेला आपला सहकारी गद्दार असल्याचे विशाल हापसे याच्या लक्षात आले होते. त्याला पत्नी सोनालीच्या संशयास्पद हालचाली समजत होत्या. घाव केल्यानंतर ज्यावेळी रक्त निघत नाही तेव्हा तो घाव करणारा नक्की आपलाच जवळचा कुणीतरी असतो. तशीच गत विशाल हापसे याची झाली होती. तो घाव त्याच्या पत्नीनेच त्याच्याशी गद्दारी करुन केला होता. आपलेच गद्दार अशी गत विशाल हापसे याची झाली होती.

पत्नी सोनालीचे आपल्याच खात्यातील विशाल खंडागळे याच्याशी संबंध असल्याची जाणीव हापसे याला झाली होती. संसाराचे हित लक्षात घेवून त्याने रागावर नियंत्रण ठेवत हा प्रकार त्याचा भाऊ देवेंद्र याच्या कानावर घातला. विशाल हापसे याचा धाकटा भाऊ देवेंद्र, काही निवडक नातेवाईक व स्वत: विशाल हापसे असे सर्व जण सन २०१९ मधे तत्कालीन डीवायएसपी राहुल मदने यांना जावून भेटले. त्यांनी विशाल हापसे याची पत्नी सोनाली व कर्मचारी विशाल खंडागळे यांच्या संबंधाची तपशीलवार माहिती डीवायएसपी मदने यांना कथन केली. डीवायएसपी मदने यांनी विशाल खंडागळे यास कार्यालयात बोलावून त्याची कानउघाडणी केली. या कानउघाडणीनंतर खंडागळे याची बदली शिर्डी पोलिस स्टेशनला करण्यात आली. मात्र कामातुरांना ना लाज ना लज्जा असा प्रकार विशाल खंडागळे याच्या बाबतीत झाला होता. बदली झाल्यानंतर देखील त्याचे सोनालीसोबत फोन कॉल व चॅटींग सुरुच होते. हा प्रकार तिचा मुलगा साईश्वर याला समजत होता. त्याने हा प्रकार त्याचे काका देवेंद्र यांना सांगितला होता. आपली तक्रार साईश्वर याने त्याचे काका देवेंद्र हापसे याच्याकडे केली असल्याचे सोनालीला समजली. त्यावेळी तिने साईश्वर यास तुला पाहून घेईन असा दम दिला. सोनालीच्या वागण्यात बदल होत नसल्याचे व ती खंडागळे याचा नाद सोडत नसल्याचे हापसे याच्या लक्षात आले होते. त्यामुळे हापसे याचा भाऊ देवेंद्र याने काही निवडक नातेवाईकांसह शिर्डी उपविभागाचे तत्कालीन डीवायएसपी सोमनाथ वाकचौरे यांची भेट घेतली. विशाल खंडागळे याच्यावर कारवाई होण्यासाठी यावेळी लेखी तक्रार देण्यात आली. शिर्डी येथे बदली झाल्यानंतर देखील खंडागळे याच्या वर्तणूकीत तसूभर देखील बदल झाला नव्हता. डीवायएसपी सोमनाथ वाकचौरे यांनी यावेळी खंडागळे याची कानउघाडणी केली. यावेळी विशाल हापसे याचीच बदली सप्टेबर २०२० मधे राहुरी येथे करण्यात आली. राहुरी येथे बदली झाल्यानंतर विशाल हापसे राहुरी शहरातील तनपुरे गल्लीतील भाड्याच्या घरात राहू लागला. मात्र मोबाईलच्या माध्यमातून सोनाली आणि तिचा प्रियकर विशाल खंडागळे यांच्यातील संवाद कायम राहिला. या माध्यमातून खंडागळे यास हापसे याचे लोकेशन समजत होते. त्यानुसार तो तिच्या मागावर रहात होता. एके दिवशी तो तिला राहुरी येथे देखील येवून भेटून गेला. या सर्व प्रकाराला विशाल हापसे पार वैतागून गेला होता. त्याचे कामात मन लागत नव्हते. त्याच्याकडून कामात किरकोळ चुका होवू लागल्या.

पुन्हा विशाल हापसे व त्याचा भाऊ देवेंद्र हापसे यांचे जवळचे नातेवाईक एकत्र आले. आता केवळ बदली हा या समस्येवरील उपाय नसल्याचे सर्वाच्या लक्षात आले होते. दिवाळी आटोपल्यानंतर १७ नोव्हेंबर २०२० रोजी हापसे याचा भाऊ देवेंद्र याच्यासह काही निवडक नातेवाईक विशाल हापसे याच्या घरी राहुरी येथे जमले. तेथे त्यांनी या प्रश्नाचे मुळ ठिकाण असलेल्या सोनालीस समजावण्याचा प्रयत्न केला. तिच्या आईवडीलांना तेथे बोलावून घेण्यात आले. सर्वांनी मिळून आता विशाल खंडागळे याच्या शेवगाव येथील घरी जावून त्याला समजावून सांगण्याचे नियोजन केले. सर्व जण राहुरी येथून शेवगाव येथे त्याला व त्याच्या जवळच्या नातेवाईकांना भेटण्यास गेले. या सर्व घडामोडी लक्षात घेता आता काहीतरी निर्णय होणार याची कुणकुण सोनालीला लागली. तिने लागलीच मोबाईलच्या माध्यमातून सर्व घटनाक्रम प्रियकर विशाल खंडागळे याच्या कानावर घातला. सर्व जण आपल्या घरी येण्यास निघाले असल्याची माहिती खंडागळे यास समजली. त्यामुळे सतर्क झालेल्या विशालने घरी जाण्याचे टाळले. तो घरी गेलाच नाही. घरी विशाल खंडागळे याची आई त्यांना भेटली. सर्वांनी मिळून त्याच्या आईला समजावून सांगीतले की तुमचा मुलगा विशाल यास थोडे समजावून सांगा. त्याच्यामुळे एक संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. विशाल खंडागळे याच्या आईला बराच वेळ समजावून सांगीतल्यानंतर सर्व जण पुन्हा आपल्या घरी येण्यास निघाले. त्यानंतर देखील सर्व नातेवाईकांनी विशाल खंडागळे व सोनाली या दोघांना समजावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला.

शुक्रवार दि. २० नोव्हेंबर रोजी रात्रीच्या वेळी देवेंद्र घरी होता. त्यावेळी त्याचा भाऊ विशाल हापसे याने त्याला फोन केला. विशालने देवेंद्रला व्हिडीओ कॉल करण्यास सांगितले. व्हिडीओ कॉलवर विशाल देवेंद्र यास म्हणाला की, 'माझी बायको सोनालीचे विशाल खंडागळे याच्यासोबत संबंध आहेत. तसे तिने कबुल केले असून ती मला आमच्यातून बाजुला होण्यास सांगत आहे. नाहीतर मारुन टाकण्याची धमकी देत आहे पुढे बोलतांना विशालने देवेंद्र यास म्हटले की मला तुला एकदा बघायचे आहे. मी विषारी औषध प्राशन केले आहे. असे बोलता बोलता विशाल हापसे जमीनीवर कोसळला. व्हिडीओ कॉलवर हा प्रकार बघून देवेंद्र यास धक्काच बसला. तो लागलीच देहरे येथून राहुरीकडे निघाला. रात्री साडे आठ वाजता विशालच्या घरी गेल्यावर तेथील लोकांनी त्याला सांगीतले की विशाल यास डॉ. कुलकर्णी यांच्या दवाखान्यात नेण्यात आले आहे. दरम्यान विशाल याची तब्येत खालावल्यामुळे त्याला पुढील उपचारासाठी प्रवरा हॉस्पीटल मधे नेण्यात आले होते. तेथील डॉक्टरांनी त्याला मयत घोषीत केले. शनिवार २१ नोव्हेंबर रोजी विशाल हापसे याच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर त्याचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. विशालचा अंत्यविधी आटोपल्यानंतर राहुरी पोलिस स्टेशनला विशालचा भाऊ देवेंद्र रामराव हापसे याच्या फिर्यादीनुसार विशाल हापसेच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेली त्याची पत्नी सोनाली हापसे, तसेच शिर्डी पोलीस स्टेशन येथे नियुक्तीला असलेला पोलीस नाईक विशाल खंडागळे या दोघांविरुद्ध गु.र.न. २००३/२०२० भा.द.वि. ३०६, ५०४, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सोनाली हापसे हिस अटक करण्यात आली. या गुन्ह्यातील दुसरा संशयीत पोलिस नाईक विशाल खंडागळे हा वृत्त लिहीत असेपर्यत फरार होता. श्रीरामपूर पोलिस उपविभागीय अधिकारी संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हनुमंत गाडे व त्यांचे सहकारी हेड कॉन्स्टेबल विठ्ठल राठोड, पोलीस नाईक निलेश मेटकर, महिला पोलीस नाईक सुर्यवंशी, महिला पोलीस कॉन्स्टेबल मनिषा गुंड असे सर्वजण या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

### चोराचा साथीदार साव बनून मदतीला ...

तरूणीला मदत करीत असेल तर याच व्यक्ती कडून आपल्याला धोका होऊ शकतो याचा प्रत्येक तरूण तरूणीने विचार केला पाहिजे. मात्र सर्वच असे नसतात हे ही तेवढेच खरे आहे. तरीही सावधपणे पाऊल टाकणे गरजेचे आहे. मुळात तरूणी आणि महिलांनी रात्रीचा लोकल प्रवास टाळावा. अगदीच तातडीची गरज भासलीच तर आपल्या सोबत आपल्या जवळच्या नात्यातील व्यक्तीला सोबत घ्यावे. अन्यथा पूरूष प्रवासाच्या डब्यातून प्रवास करावा. या सावधगिरी बाळगल्या नाहीत तर एकाकी प्रवास करणार्या महिला प्रवाशांवर लोकल प्रवासात कठीण प्रसंगाचा सामना करावा लागू शकतो. अशी भयंकर परीस्थिती आता निर्माण झाली आहे. 'कठीण समय येता कोण कामास येतो' अशी एक म्हण आहे. परंतु या घटनेत कठीण प्रसंगात मदत करण्याच्या बहाण्याने त्या व्यक्तीनेच महिला सहप्रवाशावर अतिप्रसंग केला असल्याची धक्कादायक घटना मुंबईतील कांदिवली रेल्वे स्थानकावर घडली.यामुळे चोर कोण आणि साव कोण हे ओळखण्यास किती कठिण आहे याचा अंदाज या घटनेवरून येईलच. मुंबई लोकलमधील पश्चिम रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या या तरूणी सोबत मागच्या आठवड्यात रात्री हा धक्कादायक प्रकार घडला होता. एका सोनसाखळी चोरापासून वाचवणाऱ्या तरूणीला नंतर त्या संरक्षण करणाऱ्या तरूणानेच लुटल्याची घटना घडली. त्या रात्री उशिरा घडली. एकाने चाकूचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न करायचा आणि दुसर्याने मदतीचा बहाणा करीत त्या तरूणीला लूटायचे अशी गुन्ह्याची पद्धतीचा अवलंब प्रथमच करण्यात आल्याचे रेल्वे पोलीसांनी सांगितले. कांदिवली येथे राहणारा आपल्या भावाला भेटण्यासाठी तरूणीने बोरिवलीहून रात्री ११ वाजून ४४ मिनिटांची लोकल पकडली. ती लोकलच्या जनरल डब्ब्यात चढली असता संपूर्ण डब्ब्यात सामसूम होती. केवळ एक रहिम शेख नावाचा ३२ वर्षीय तरूण डब्ब्यात झोपलेला होता. त्यानंतर हा भयकंर प्रसंग घडला. बोरिवलीहून ट्रेन सुटण्याआधी एक तरूण लोकलमध्ये चढला. त्या ३२ वर्षीय तरूणाचे नाव ओमप्रकाश दिक्षित असल्याचे पोलिसांकडून नंतर समजले. ओमप्रकाशने डब्ब्यात घुसताच त्या तरूणीच्या गळ्यावर चाकू ठेवला आणि तिने परिधान केलेला सोन्याचा नेकलेस व मोबाईल देण्यास सांगितलं. तरूणीचं रडणं ऐकून उठलेल्या रहीम शेखने दिक्षितशी दोन हात करत त्याला डब्ब्यातून हाकलून लावले. तसेच, तु माझ्या बहिणीसारखी आहेस. 'तुला कोणताही धोका नाही', असे रहीमने तरूणीला सांगितले. बोरिवली स्टेशनवरून ट्रेन सुटताना रहीमने दिक्षितला हाक मारून परत डब्ब्यात बोलवून घेतले. त्यानंतर बोरिवली ते कांदिवली स्टेशनांदरम्यान, रहीमने त्या तरूणीशी वाईट वर्तणुक केली. तिचे दागिने आणि मोबाईलदेखील लुटला. हा प्रकार घडत असतानाच तरूणीने अलार्मची चेन खेचली आणि तितक्यात कांदिवली स्टेशन आल्याने दोघेही डब्ब्यातून उतरून पसार झाले. अलार्मच्या आवाजामुळे स्थानिक रेल्वे पोलिसांनी चपळाई दाखवत दिक्षितवर झडप टाकून त्याला लगेचच पकडले, मात्र रहिम शेख निसटला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. बोरिवली रेल्वे पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक भास्कर पवार यांनी याबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, उउढत कॅमेऱ्यात कैद झालेल्या दृश्यांच्या आधारावरून एक स्केच तयार करून घेण्यात आले. त्यानंतर विविध तुकड्या कांदिवली आणि आसपासच्या परिसरात पाठवण्यात आल्या. रहीम शेख हा अंमली पदार्थाचे सेवन करणारा तरूण असल्याचे आम्हाला समजले. कांदिवलीतील झोपडपट्टीमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांमधून रहीम अशी कामं करतो अशी माहिती आम्हाला मिळाली. त्यानुसार रहीमला कांदिवली पश्चिम येथून अटक करण्यात आली. रहीम शेख आणि दिक्षित एकमेकांना आधीपासून ओळखत नव्हते. तरूणीला वाचवण्याचं रहीमने केवळ नाटक केलं होतं. त्यानंतर तरूणीला लुटण्याची संधी असल्याचं पाहिल्यावर त्याने पटकन दिक्षितला बोलावून घेतलं होते, असेही पवार यांनी स्पष्ट केले. सध्या कोरोनाचा काळ चालू आहे. त्यामुळे लोकल प्रवासात मोजकेच प्रवासी प्रवास करीत असतात.महिलांच्या डब्यात तर एक्का दुक्का महिला प्रवासी प्रवास करीत असतात तेव्हा हे प्रवासी गर्दुल्ले, चोरटे, लूटमारी करणार्यासाठी सॉफ्ट टार्गेट असतात. अशा महिला प्रवाशांवर धोक्याची तलवार नेहमीच लटकत असते.यासाठी महिला प्रवाशांनी रात्रीचा प्रवास टाळणे कधीही योग्य आहे.

## अहमदपूर पोलिसांनी ट्रक चोरणाऱ्या टोळीच्या आवळल्या मुसक्या

**अहमदपूर/फिरोज शेख**

शहरापासुन नांदेड रोडवर आठ किमी अंतरावर असणाऱ्या सुनेगाव (सांगवी) फाट्याजवळील वन विभागाच्या पर्यटन केंद्रासमोर एक ट्रक अज्ञात आरोपींनी कार आडवी लावुन मारहाण व चाकुचा धाक दाखवुन पळवुन नेला होता तो ट्रक व चोरी करणारी टोळी चोवीस तासाच्या आत अहमदपूर पोलीसांनी जेरबंद केली आहे.

याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की फिर्यादी बालाजी नारायण देवकत्ते (वय ३८ वर्ष रा उत्तर रूई ता अहमदपूर) यांनी दि २६ नोव्हेंबर रोजी पहाटे ४.२० वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या ताब्यातील ट्रक क्रमांक एम एच ३१ एम ७०५९ हा सिध्दी शुगर साखर कारखाना येथुन यल्लादेवी ता उदगीर येथे उस घेऊन येण्यासाठी जात असताना त्यास अहमदपूर शहरापासुन आठ किलोमिटर अंतर असणाऱ्या पर्यटन केंद्र वन विभाग नांदेड रोड सुनेगाव येथील गेट समोर कार क्रमांक (एम एच १२ के टी ६२८६ )या कारने सदरील ट्रकला ओहरटेक करुन त्यामधील अज्ञात आरोपींनी फिर्यादीस कोयत्याने मारहाण करून चाकुचा धाक दाखवुन त्याच्या ताब्यातील ट्रक किंमत अंदाजे पाच लाख रुपये व हेरो कंपनीचा ६०० मॉडलचा मोबाईल अंदाजे किंमत ८०० रू जबरदस्तीने घेऊन पळवुन नेल्याची फिर्याद दिली होती. त्याअनुशंगाने अहमदपूर पोलिस ठाण्याचे पोलीस निरिक्षक सुनिल बिर्ला यांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देवून घटनेची प्राथमिक माहीती जाणून घेतली. जिल्हा पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे अप्पर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव उपविभागीय पोलीस अधिकारी बलराज लंजिले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांचं एक पथक तयार केले. या पथकात उप- निरीक्षक एकनाथ डक, विजय पाटील, पोहेकॉ सुहास बेंबडे , पोना हनमंत माने, पोना कैलास चौधरी, पोना संतोष गेडाम, पोकॉ परमेश्र्वर वागतकर, पोकॉ परमेश्वर भरकाडे, पोकॉ सुदर्शन घुगे, होमगार्ड मोहन पांचाळ आदिंचे समावेश करून तपासाची सुत्रे गतीमान केली. तपासाअंती आरोपींचा सुगावा लागल्यानंतर उदगीर येथुन चालक ईस्माइल पठान (वय २३ वर्ष रा नळगीर ता उदगीर), अक्षय पंडीत( वय २४ वर्ष रा उदगीर ) नितीन डुकरे (वय २७ वर्ष रा लोणी ता उदगीर) अक्षय कांबळे (वय २८ वर्ष रा उदगीर) संदिप गजगे (वय २५ वर्ष रा उदगीर) राजरतन काकडे (वय २८ वर्ष रा पिंपरी ता उदगीर ) राहुल कांबळे (वय २३ वर्ष रा निडेबनवस ता उदगीर) अविनाश सुर्यवंशी (वय ३० वर्ष रा उदगीर) यांना चोवीस तासाच्या आत अटक करण्यात आली असुन एक ट्रक अंदाजे किंमत ५ लाख रुपये , एक मोबाईल ८०० रु ,एक कार ६ लाख रुपये, एक कोयता, एक चाकु असा मुद्देमाल सदरील आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे. सदरील आठ आरोपी विरूद्ध अहमदपूर पोलीसात गुरन नंबर ३६९/२० कलम ३९५,५०६ भादवी नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप- निरिक्षक विजय पाटील हे करीत आहे.

## पान ८ वरून....

### महाराष्ट्र घाबरला नाही... घाबरणार नाही...

जाऊ देणार नाही, अशी ग्वाही देतानाच वर्षभरात घेतलेल्या महत्वाच्या निर्णयांचे प्रतिबिंब या पुस्तिकेत उमटले असून पुस्तिकेच्या उत्तम निर्मितीबद्दल मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

**संकटग्रस्ताला धीर देण्याचे काम- खा.शरद पवार**

खासदार शरद पवार म्हणाले की, हे सरकार म्हणजे जगन्नाथाचा रथ असून त्याला पुढे नेण्याची कामगिरी सर्वाच्या साथीने होत आहे. वर्षभरात संकटग्रस्ताला धीर देण्याचे काम या शासनाने केले आहे. त्यामुळे संकटकाळात बळीराजा कधी रस्त्यावर आला नाही. नविन उमेद आणि प्रदीर्घ अनुभव या समन्वयातून या शासनाची वाटचाल सुरू असल्याचे सांगतानाच लोकांचा सहभाग यात दिसून आल्याचे त्यांनी सांगितले.

**समर्थ महाराष्ट्राला घडविण्याचा निर्धार- उपमुख्यमंत्री पवार**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, जनतेच्या विकासासाठी हे सरकार बांधील आहे. या शासनाची वर्षपूर्ती ही समर्थ महाराष्ट्राला घडविणाऱ्या निर्धाराची असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली जनता आणि प्रशासन यांच्यात संघभावना निर्माण करण्याचे काम केल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. कोरोना योद्धयांचे आभार मानत कोरोना काळात विकासकामांना खीळ बसणार नाही याची ग्वाहीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली. विविध विभागांच्या निर्णयांचा समावेश असलेली ही पुस्तिका प्रकाशीत केल्याबद्दल त्यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे कौतुक केले.

**नागरिकांना विविध उपाययोजनांनी दिलासा- महसुलमंत्री**

महाविकास आघाडीचे सरकार किमान समान कार्यक्रमावर काम करीत असून अतिवृष्टी, चक्रीवादळ कोरोना याकाळात नागरिकांना विविध उपाययोजनांनी दिलासा देण्याचे काम केले आहे. गेल्यावर्षी शिवतीर्थावर झालेला शपथविधी सोहळा ऐतिहासिक क्षण असल्याचा उल्लेख महसुलमंत्री थोरात यांनी केला. यावेळी त्यांनी राज्य शासनाने वर्षभरात शेतकरी, सामान्य नागरिक, विद्यार्थी आदी घटकांसाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. उद्योगमंत्री देसाई यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

### भिवंडीत कत्तलीसाठी चार चाकी गाडीतून...

मारून पलायन केले असता पोलिसांनी गाडीची झाडाझडती घेतली असता या गाडीतील मागच्या बाजूच्या सीट मध्ये फेरबदल करून तीन जिवंत गायी आढळल्या. या गायींमध्ये १० हजार रुपये किंमतीची पाच वर्षाची एक गीर जातीची गाय, एक दहा हजार रुपये किंमतीची जर्सी गीर क्रॉस जातीची ३ वर्ष वयाची गाय तसेच एक १२ हजार रुपये रक्कमेची चार वर्ष गावठी गीर गाय अशा एकूण ३२ हजार रुपये किंमतीच्या तीन जिवंत गायी आढळल्या. पोलिसांनी सदर गाडी जप्त करून शेलार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून स्थानिकांच्या मदतीने गायीची सुटका केली. दरम्यान गाडीतील पाचही जण बाजूला असलेल्या झोपडूपट्टीकडे पळून गेले. याप्रकरणी अब्दुल्ला मौला शेख (रा. नवी वस्ती) गुड्डू, नदीम, जमील, तसेच गाडी मालक अशा पाच जणांवर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल धनंजय राजेंद्र बेरे यांनी गुन्हा दाखल केला असून तालुका पोलीस या फरार आरोपींचा शोध घेत आहेत. दरम्यान जप्त केलेल्या गाडीतून तीन मोबाईल फोन तसेच अब्दुल्ला मौला शेख याचे वाहन परवाना तसेच पॅन कार्ड व मतदार कार्ड व इतर ओळखपत्र तसेच वेगवेगळ्या गाडी नंबरच्या चार नंबर प्लेट व इंजेक्शन, दगडांनी भरलेली थैली, स्टीलचे रॉड असे साहित्य पोलिसांनी जप्त केली असून त्यानुषंगाने तालुका पोलीस फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

### भिवंडीत वन विभागाच्या १५० एकर ...

त्यामुळे राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी वन विभागाच्या जागेतील अनधिकृत तलावांवर तात्काळ कारवाई करून सदर मत्स्यसाठा ८ दिवसांत नष्ट करून याबाबतच्या कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच या प्रकरणी सहाय्यक मत्स्य व्यवसाय आयुक्तांना दोन दिवसात खुलासा देण्याचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे अतिक्रमण झालेली वनजमीन वनखात्याच्या ताब्यात घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश देखील समिती अध्यक्ष विवेक पंडित यांनी दिले आहेत.

भिवंडी तालुक्यात भूमिहिनांना वाटप करण्यात आलेल्या नवीन शर्तीच्या जमिनी आणि भिवंडी उपविभाग क्षेत्रातील वनहक्क कायद्याची अंमलबजावणीबाबत राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष विवेक पंडित (राज्यमंत्री दर्जा) यांनी आढावा घेतला. भिवंडीतील राहुर, कुंभारशिव, शिरगाव या परिसरात भूमिहीनांना तसेच वन पट्टे धारकांना दिलेल्या जमिनीवर आदिवासींच्या दारिद्र्य व अशिक्षितपणाचा फायदा घेऊन काही लोकांनी अनधिकृतपणे तलाव खोदून त्यात बंदी असलेल्या मांगुर माश्यांचे पालन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी वन विभागाच्या १५० एकर जमिनीवर १२६ पेक्षा जास्त तलाव आढळून आले.सदर मांगुर माश्यांच्या उत्पादनामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या पाहणी दौऱ्याच्यावेळी भिवंडीचे उपविभागीय अधिकारी डॉ.मोहन नळदकर ,तहसीलदार आदीक पाटील, गटविकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे, प्रकल्प अधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी, पोलीस निरीक्षक पडघा, तसेच महसूल, वन व आदिवासी खात्याच्या अधिकाऱ्यांच्या समक्ष घटनास्थळी जाऊन स्थळ पाहणी केली. त्यावेळी या परिसरात मांगुर माशाचा मोठा साठा असलेले तलाव आढळून आले. तसेच या परिसरात काही बेकायदेशीर बांधकामे देखील महसूल आणि वन विभागाच्या जागेवर आढळून आली आहेत.या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना प्रांत अधिकारी डॉ.मोहन नळदकर यांनी सांगितले की आदिवासींच्या प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रशासन पूर्णतः सकारात्मक असून कायदेशीर तपासण्या करून आदिवासींचे प्रश्न तात्काळ सोडवले जातील तसेच भिवंडीत सरकारी बंदी असलेले मांगुर माश्यांची होणारी पैदास तात्काळ बंद करण्यात येईल. यावेळी राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष विवेक पंडित (राज्यमंत्री दर्जा) यांच्यासोबत उपविभागीय अधिकारी डॉ.मोहन नळदकर, तहसीलदार आदिक पाटील, गट विकास अधिकारी डॉ. प्रदीप घोरपडे, पडघा वन परक्षेत्र अधिकारी संजय धारावणे, सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश मोहिते, उपअभियंता दत्तू गीते, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीम.गलांडे यांच्यासह इतर अधिकारी तसेच श्रमजीवी संघटनेचे तालुध्यक्ष सुनिल लोणे, सागर देसक, सरचिटणीस बाळाराम भोईर, मोतीराम नामकुडा, संगीता भोमटे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्राईम संध्या सोमवार दि. ०७ डिसेंबर २०२० ते रविवार दि. १३ डिसेंबर २०२० लातूर/पालघर www.crimesandhya.com ७

# सोलापूर जिल्हा वाहतूक शाखेने दिले ऊस वाहतूक करणाऱ्या चालकांना नियमांचे प्रबोधन



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सध्या महाराष्ट्र राज्यात व सोलापूर जिल्ह्यात साखर कारखान्याचे ऊस गाळप मोठ्या प्रमाणात सुरु झालेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त कारखाने असल्याने ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे आणि ऊस वाहतूक चालक हे त्यांच्या वाहनांवर कर्कश आवाजात टेप रेकॉर्डर लावणे, रिफ्लेकटरचा वापर न करणे, क्षमतेपेक्षा अधिक माल वाहतूक करणे, अतिवेग व अनियंत्रित वाहन चालविणे तसेच मद्यपान करून वाहन चालविणे अशा नियम बाहय व अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी करताना निदर्शनास येतात. ज्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे मानवी चुकांमुळे होणारे हे अपघात टाळण्याकरिता वाहन चालक व वाहन मालक यांच्यात जनजागृती करणे आवश्यक आहे. जेणेकरून वाहन अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल याच हेतूला धरून सोलापूर ग्रामीण वाहतूक शाखा जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या ऊस वाहतूक करणाऱ्या वाहन चालकामध्ये व मालकामध्ये जनजागृती करून वाहनांना रिफ्लेक्टर व रेडिअम लावून होणारे अपघात कमी करणे अशी संकल्पना सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते व अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी मांडली आहे. त्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यामध्ये असणाऱ्या ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचे अपघात कमी करण्याची जबाबदारी सोलापूर ग्रामीण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे व त्यांचे पोलीस कर्मचारी तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस अधिकारी स्वीकारले आहे.

२ डिसेंबर रोजी मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अनगर येथील लोकनेते सहकारी साखर कारखाना ता मोहोळ व भीमा सहकारी साखर कारखाना टाकळी सिकंदर ता. मोहोळ या कारखान्याला जिल्हा वाहतूक शाखा तसेच मोहोळ पोलीस ठाणे यांचे संयुक्त विद्यमानाने ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना रिफ्लेक्टर व रेडिअम लावणे तसेच ऊस वाहतूक करणारे चालक यांना मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

३ डिसेंबर रोजी लोकमंगल साखर कारखान बीबीदारफळ ता उत्तर सोलापूर लोकमंगल साखर कारखाना भंडारकवठे ता दक्षिण सोलापूर आणि सिद्धनाथ साखर कारखाना तिऱ्हे ता उत्तर सोलापूर येथे जिल्हा वाहतूक शाखा व सोलापूर तालुका पोलीस ठाणे, मंद्रुप पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने रिफ्लेक्टर व रेडिअम लावणे तसेच ऊस वाहतूक चालकांना वाहतुकीचे नियम मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे म्हणाले की, अपघात रोखता येऊ शकतात तरीही अपघाताकडे दुर्लक्ष व खुनासारख्या घटनाकडे गांभीर्याने पाहिले जाते हे दुर्दैवी आहे. अपघाती मृत्यू नंतर आपल्या व अपघातातील व्यक्तीच्या उघड्यावर येणाऱ्या कुटुंबीयांचा वेदना वाहन चालकांनी समजून घ्यायला हवे, यासाठी काळजीपूर्वक वाहन चालवून होणारे अपघात व मृत्यूपासून स्वतःला वाचवा, असे आवाहन पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी केले. तसेच कर्णकर्कश आवाजात टेप रेकॉर्डर लावणे, रिफ्लेक्टरचा वापर न करणे, क्षमतेपेक्षा अधिक माल वाहतूक करणे, अतिवेग व अनियंत्रित वाहन चालविणे तसेच ऊस वाहतूकदारांनी मद्यपान करून वाहन चालविणे यासर्व गोष्टी नियमबाहय व अपघाताला कारणीभूत ठरणाऱ्या आहेत. याकडे दुर्लक्ष करणाऱ्या वाहन चालकांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे. तसेच वाहन चालवताना ताशी दहा किलोमीटर वेगमर्यादा ठेवावी, प्रवासा दरम्यान अचानक वाहन नादुरुस्त झाल्यास शक्यतो रस्त्याच्या बाजूला वाहन घेऊन उभी केली पाहिजे. मोबाईल हेडफोन वा कर्णकर्कश आवाजात गाणी वाजविणे या सर्व बाबी अपघाताला निमंत्रण देणारी आहेत.

यासाठी वाहन चालकांनी काळजी घ्यावी अन्यथा नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी असा इशारा दिला आहे. सदरचे कार्यक्रम हे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहन चालक व मालकांचे मेळावे हे सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, पोलीस उपनिरीक्षक आण्णप्पा संगोळगी व मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अशोक सायकर व सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप, मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे पोलीस उपनिरीक्षक गणेश पिंगुवाले यांनी सदर मेळावा आयोजित केला होता.

# उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांचा लिंगायत समाज आणि विविध संघटनांच्या वतीने सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

लिंगायत समाज व विविध संघटनांच्या वतीने चंद्रकांत बिराजदार यांनी उपमहापौर म्हणुन २२ नोव्हेंबर एक वर्ष पूर्ण करत लातूर नगरीच्या जनतेसाठी कोरोना संकटात अहोरात्र सेवा केल्याबद्दल ॲड. माधवराव पाटील टाकळीकर यांच्या अध्यक्षतेखाली व विश्वनाथ निगुडगे, इंजि.राजकुमार कत्ते, शिवलिंग जेवळे, प्रा. राजेश विभुते, ईरण्णा पावले, करीम लाला, श्रीकांत हिरेमठ यांच्या उपस्थितीत उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांचा आई व धर्मपत्नी सौ. महादेवीताई बिराजदार यांचा महात्मा बसवण्णाचे तैलचित्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलतांना बिराजदार म्हणाले महात्मा बसवेश्वर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती संपवण्यासाठी आयुष्य वेचले परंतु आज शिक्षित माणूस जातीवादी होत चालला आहे अशी खंत व्यक्त केली महापौर, पालिका कर्मचारी व प्रशासकीय अधिकारी सर्वांनी कोरोना संकटात खांद्याला खांदा लावून काम केले येणाऱ्या काळात नागरी सुविधा देण्यासाठी आपल्या आशीर्वादाने प्रयत्न करत राहील असे विचार मांडले. उपमहापौर म्हणून लातूर नगरीच्या नागरीकांची सेवा करण्याची संधी मिळाली आपल्या आशीर्वादाने कोरोना-महामारीच्या संकटात अहोरात्र काम करत गेलो काम करताना समाजाची मान झुकणार नाही यासाठी काळजी घेतली असे उद्गार उपमहापौर बिराजदार यांनी काढले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी ॲड . टाकळीकर म्हणाले बुद्ध बसवण्णा आंबेडकरांचे विचाराने प्रेरित होऊन जात धर्म पंथ विसरुन कोरोना संकटात नागरींकाची सेवा केल्यामुळेच आपले अभिनंदन गौरव होत आहे आपल्या कार्यातून लातूर नगरी गौरव वाढावा असे विचार मांडले अभिनंदन पर अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते सुत्रसंचालन व आभार प्रा. राजेश विभुते यांनी केले.

# सातपाटी येथील बेपत्ता मासेमारी बोट सापडली; सर्व मच्छिमार सुरक्षित



**सातपाटी/प्रतिनिधी**

सातपाटी येथून मासेमारीसाठी खोल समुद्रात गेलेल्या पण नंतर बेपत्ता झालेल्या बोटीचा शोध घेऊन त्यावरील मच्छिमारांना वाचवण्यात पोलिसांना यश आले आहे. २६/११/२०२० रोजी सकाळी ६.३० वाजता सातपाटी येथून आयएन डीएमएच २ एमएच १२२३ क्रमांकाची अग्निमाता नावाची बोट मासेमारीसाठी समुद्रात गेली होती. या बोटीवर ज्ञानेश्वर तांडेल, दिलीप तांडेल, जगन्नाथ तांडेल आणि पांडुरंग धनु हे मच्छिमार होते. मात्र सायंकाळी ६ वाजेपर्यंत हि बोट न परतल्याने मच्छिमारांचे कुटुंबीय काळजीत पडले. आणि त्यांनी २७/११/२०२० रोजी या प्रकरणी सातपाटी पोलीस ठाण्यात मिसिंगची फिर्याद नोंदवली. त्यानंतर या बेपता बोटीचा तपास सुरु झाला. दरम्यान ज्या दिवशी हि बोट बेपत्ता झाली त्याच दिवशी सायंकाळी ती प्रदीप पाटील यांच्या राजधानी नावाच्या मच्छिमार बोटीला सायंकाळी ५ वाजता इंजिन बंद पडलेल्या अवस्थेत दिसली होती. त्यावेळी प्रदीप पाटील यांनी अग्निमाताच्या मच्छिमारांना सांगितले होते कि आम्ही मासेमारी करून परतल्यावर तुमच्या बोटीला घेऊन जाऊ तोवर तुम्ही थांबा. मात्र ते जेंव्हा परतले तेंव्हा ती बोट तेथे नव्हती. त्यामुळे चिंता वाढली. अखेर या प्रकरणी नौसेना सागरी पोलीस ठाणे आदी संबंधिताना मैलद्वारे माहिती कळवण्यात आली. मात्र काहीच पत्ता लागला नाही.

दरम्यान पालघरचे पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या आदेशावरून २८/११/२०२०रोजि सहा.पो.नि. सुधीर धाय्कर यांनी गावातील महालक्ष्मी दीपलक्ष्मी मातोश्री व ओम सैराम या बोटीन बेपता बोटीचा शोध घेण्यासाठी समुद्रात रवाना केले आणि तेंव्हा कुठे हि बोट सापडली. या बोटीवरील सर्व मच्छिमार सुरक्षित आहेत.



# देवणी तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भिंगे यांना श्रध्दांजली

देवणी : देवणी तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सदाशिव भिंगे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष यांचा कार अपघातात दुर्दैवी निधन झाला. त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी म्हणून रविवार रोजी देवणी तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी शोकसभा घेऊन भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. सदाशिव भिंगे हे पक्ष वाढीसाठी व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या अडीअडचणीला एका हाकेला हो म्हणून धावून येणारे व विशेषतः मनमिळाऊ स्वभावाचे जिल्हा अध्यक्ष अशी त्यांची ओळख होती. यासह आदी आठवणीला या प्रसंगी उजाळा देण्यात आला. यावेळी भैय्यासाहेब देवणीकर, देविदास बोंबळीकर, उद्धव तवडे, आनंद कांबळे, धनराज बनसोडे, भावेश लासुरे, सतीश कांबळे, धनाजी कांबळे, रवींद्र बनसोडे, रत्नदीप गायकवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# समृध्दी कोकण पर्यटनाची : वर्षपूर्ती शासनाची

**कोरोनाच्या आपत्तीने साऱ्या क्षेत्रात कमी अधिक परिणाम झाला. कोरोनाचा सर्वाधिक फटका पर्यटन उद्योगाला झाला. हळूहळू जनजीवन पूर्वपदावर आले. महाराष्ट्र थांबला नाही. थांबत नाही हे पून्हा एकदा दिसून आलं. म्हणूनच महाराष्ट्र शासनाने वर्षभराच्या कार्यकाळात पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. या महत्त्वपूर्ण निर्णयांमध्ये कोकणातील पर्यटन विकासाला चालना देणारे निर्णय महत्त्वाचे ठरले आहेत. हे विशेष.**

पर्यटनासाठी पोषक असलेल्या कोकण विभागात ठाणे,रायगड, रत्नागिरी व पालघर हे चार जिल्हे असून ठाणे जिल्हयाचे क्षेत्रफळ ४२१४ चौ.कि.मी असून ठाणे जिल्हयाला २७ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे, रायगड जिल्हयाचे क्षेत्रफळ ७१६२ चौ.कि.मी. आहे. रायगड जिल्हयाला २४० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. रत्नागिरी जिल्हयाचे क्षेत्रफळ ८२०८ चौ.कि.मी. आहे. रत्नागिरी जिल्हयाला १६७ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. पालघर जिल्हयाचे क्षेत्रफळ ५३४४ चौ.कि.मी असून पालघर जिल्हयाला ८५ कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे, ठाणे जिल्हयात येऊर, चायना ब्रीज, जव्हार, वसई, अर्नाळा, केळवे बीच,वज्रगड,डहाणू, मलंगगड, सिंहगड, अंबरनाथचे शिवमंदिर, काकोळे तलाव, टिटवाळयाचा महागणपती, शहाडचे बिर्ला मंदिर, माहुलीगड, वज्रेश्वरी, रायगड जिल्हयात मुरुड-जंजिरा किल्ला, हरिहरेश्वर, किल्ले रायगड, माथेरान, बिर्ला मंदिर, कर्नाळा अभयारण्य, घारापुरी बेट, चौल, किहिम, महाड, मढ, पाली, रत्नागिरी जिल्हयात पन्हाळकाझी लेणी, प्राचीन कोकण, थंड हवेचे ठिकाण माचाळ, हेदवी दशपुजा गणपती मंदिर, वेळणेश्वर, आरेवारे समुद्रकिनारा, माँसाहेब मशिद, संगमेश्वर येथील गरम पाण्याचे झरे, धोपेश्वर, सवतसडा धबधबा, रघुवीर घाट, गणपतीपुळे अशी पर्यटनस्थळे आहेत.

कोकणात पर्यटनाच्या माध्यमातून मोठी उलाढाल होते. कृषी किंवा ग्रामीण पर्यटनाला गाव पातळीवर चालना देण्याची गरज लक्षात घेऊन यावर्षी शासनाने पर्यटनाला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद केली. राज्यात पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी कोकणातील समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटन वाढविण्यासाठी ८ सागरी किनाऱ्यांवर बीच शॅक्स (चौपाटी कुटी) उभारण्यासंदर्भातील महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला. या कुट्या तात्पुरत्या हंगामी स्वरुपाच्या असतील . सध्या पायलट प्रोजेक्ट म्हणून कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकली रायगड जिल्ह्यातील वौली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या ८ किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारण्यात येतील. या संदर्भातील अर्ज www.maharashtratouriom.porin या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असून पुढील वर्षीपासून इतर चौपाट्यांवर देखील या धोरणाची टप्याटप्प्याने अंमलबजावणी होईल. महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या सहमतीने पर्यटन संचालनालयाने निश्चित केलेल्या जागेवरच तात्पुरती चौपाटी कुटी उभी करण्यासाठी परवाना देण्यात येईल. एका चौपाटीवर कमाल १० कुटी उभारता येतील. स्थानिकांना ते उभारण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल. तसेच निर्माण होणाऱ्या रोजगारामध्ये स्थानिक व्यक्तीसाठी ८० टक्के जागा राखीव असतील. या कुट्यांचे तीन वर्षाकरिता वाटप करण्यात येईल. त्यांचा आकार १५ फुट लांबी आणि १५ फूट रुद आणि १२ फूट उंच असेल. गाळ्याच्या समोर बैठक व्यवस्थेसाठी २० फूट लांब आणि १५ फूट रुंद छत टाकता येईल. कुटी मिळणाऱ्या व्यक्तीकरिता परवान्यासाठी १५ हजार रुपये अर्जाचे नापरतावा मुल्य असेल. तसेच या कुटीसाठी पहिल्या वर्षी ७५ हजार , दुसऱ्या वर्षी ५० हजार, तिसऱ्या वर्षी ५५ हजार वार्षिक शुल्क राहील. याशिवाय ३० हजार रुपये सुरक्षा अनामत जमा करावी लागेल, जी तीन वर्षाचा कालावधी संपल्यानंतर परत केली जाईल. चौपाटी कुटी चालविण्यासदर्भात पर्यटन विभागाने विविध नियम घालून दिले आहेत. या चौपाटी कुटीस सकाळी ७ ते सायंकाळी ७ अशा वेळेत सुरु ठेवता येईल. तसेच संगीताचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. प्रत्येक कुटीमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा देखील असेल. या निर्णयामुळे गोव्याकडे जाणारे पर्यटक कोकणाकडे आकर्षित होतील.

राज्यातील शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय आणि नागरिकांना पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी राज्यात कृषिपर्यटन धोरण राबविण्यात आले आहे. या निर्णयाचा कोकणातील शेतक-यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे कोकणातल्या शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध, कृषी पूरक व्यवसायांना प्रोत्साहन, गावातील महिला तरुणींना रोजगाराची संधी देणे, लोककला आणि परंपरांचे दर्शन घडविणे, पर्यटकांना प्रत्यक्ष शेतीतील कामाचा अनुभव देणे, प्रदूषणमुक्त व निसर्गाच्या सानिध्यात राहण्याचा अनुभव देणे असा या धोरणाचा उद्देश आहे. यासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकऱ्यांच्या कृषी सहकारी संस्था, कृषी विज्ञान केंद्र, कृषी महाविद्यालये, कृषी विद्यापीठे, शेतकऱ्याच्या भागीदारी सस्था किंवा कंपन्या या कृषी पर्यटन केंद्र उभारु शकतात. या पर्यटन केंद्रांना पर्यटन विभागाकडून नोंदणी प्रमाणपत्र मिळेल, त्यांना बँक कर्ज मिळू शकेल. वस्तु व सेवा कर तसेच विद्युत शुल्क इत्यादीचा लाभ घेता येईल. दोन एकर ते पाच एकर पर्यत शेतीचे क्षेत्र असणाऱ्या ठिकाणी राहण्याची सोय असलेल्या खोल्या आवश्यक असून या ठिकाणी भोजन व्यवस्था व स्वयंपाक घर असणे आवश्यक आहे. यामुळे कृषि पर्यटन वलीस लागेल.

पर्यटन महामंडळातर्फे काही योजनांची गंभीरपणे आखणी सुरू आहे. या वर्षात राज्य पर्यटन महामंडळाने कोकणातील आजपर्यत दुर्लक्षित पण पर्यटनाच्या दृष्टीने वाव असलेल्या ठिकाणी स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या निवास व न्याहरीसारख्या उपक्रमांना प्रोत्साहन दिलं आहे. राज्यात हॉस्पिटॅलिटी म्हणजेच आदरातिथ्य क्षेत्रासाठी क्रांतिकारी निर्णय पर्यटन विभागाने घेतला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे कोकणातील आदरातिथ्य उद्योगांना विकासाचा वेग मिळाला आहे. या उद्योगांना सुरू करण्यासाठी ७० परवानग्यांऐवजी आता १० परवानग्या तसेच ९ स्वयं प्रमाणपत्रे लागतील. परवानग्या, परवाने यांच्या संख्या लक्षणीयरीत्या कमी केल्यामुळे व्यवसाय सुलभता येऊन या उद्योगाला मोठ्या प्रमाणावर गती मिळेल तसेच गुंतवणूक आकर्षित होऊन रोजगारही वाढणार आहे व्यवसाय सुलभतेच्या दृष्टीने आदरातिथ्य क्षेत्रासाठी फक्त १० परवानग्या/परवाने/ना-हरकत प्रमाणपत्रे आणि ९ स्वयं प्रमाणपत्रे लागू करण्यात येतील. जेथे कायद्याने कालमर्यादा निश्चित केलेली नाही अशा सर्व परवानग्या/परवाने/ना- हरकत प्रमाणपत्रांचा वैधता कालावधी निर्गमित केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाचा राहील. या सेवा महाराष्ट्र सेवा हक्क अधिनियम २०१५ च्या कक्षेत आणण्यात येतील. आदरातिथ्य क्षेत्रासाठी अधिक व्यवसाय सुलभता निर्माण होण्याकरीता एक खिडकी योजना अंतर्गत एकाच ऑनलाईन अर्जाव्दारे परवानग्या देण्याबाबतची कार्यवाही पर्यटन विभागामार्फत करण्यात येणार आहे.

एमटीडीसीच्या (महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ) ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा पर्यटनदृष्टया विकास करण्यासाठी खाजगीकरणाच्या धोरणास तत्वत : मान्यता देण्याचा निर्णय देखील शासनाने घेतला आहे. पहिल्या टप्प्यात गणपतीपुळे, माथेरान, महाबळेश्वर, हरिहरेश्वर, मिठवाव येथील महामंडळाचे रिसॉर्ट तसेच ताडोबा आणि फर्दापूर (औरंगाबाद) येथील मोकळ्या जमिनींचा विकास करण्यात येईल. या मालमत्ता पोटभाड्याने देण्याचा कालावधी उच्चस्तरीय समिती ठरवेल. तसेच जमिनीसाठी आकारावयाचे अधिमुल्य व वार्षिक भाडे देखील निश्चित करण्यात येईल . प्रत्येक प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करण्यात येईल. या निर्णयामुळे एमटीडीसीच्या सेवांचा दर्जा वाढेल. उत्तम सोयी सुविधांमुळे जास्तीत जास्त आणि विदेशी पर्यटक देखील मोठयाप्रमाणात कोकणाकडे येतील. पर्यटनवृध्दी हेच महत्त्वाचे लक्ष्य असणार आहे. कोरोनाच्या धक्क्यातून सावरत कोकण पर्यटनाला महाराष्ट्र शासनाने उभे केले आहे. गोव्यापेक्षा आर्थिकदृष्ट्या परवडणारं आणि कौटुंबिक पर्यटनासाठी शांत व सुरक्षित परिसर म्हणून कोकणाची पसंती वाढली आहे. कोकणातील पर्यटनवाढीसाठी शासनाने घेतलेले निर्णय आगामी काळासाठी दिशादर्शक ठरतिलच यात शंका नाही.



**– प्रविण डोंगरदिवे**

माहिती सहाय्यक, विभागीय माहिती कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई

# महाराष्ट्र घाबरला नाही... घाबरणार नाही... जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

## वर्षपूर्ती सोहळ्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची ग्वाही




**मुंबई/प्रतिनिधी**

जनतेच्या विश्वासाच्या बळावर स्थापन झालेल्या राज्यातील महाविकास आघाडी सरकारने वर्षपूर्ती केली असून कितीही संकटे आली तरी महाराष्ट्र घाबरला नाही, घाबरणार नाही असे सांगतानाच जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे महाविकास आघाडी शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित पुस्तिकेचा प्रकाशन सोहळा झाला त्यावेळी उद्धव ठाकरे बोलत होते. खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसुलमंत्री बाळासाहेब थोरात, उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य, खासदार, आमदार यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसुल मंत्री बाळासाहेब थोरात, माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री कु.अदिती तटकरे, सचिव तथा महासंचालक डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते 'महाराष्ट्र थांबला नाही, थांबणार नाही' या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, जनतेच्या आशीर्वादामुळे तीन पक्षांचे सरकार वर्षभरापूर्वी अस्तित्वात आले. वर्षभरात नैसर्गिक संकटांना तोंड देत राज्यातील जनतेच्या पाठीशी ठामपणे हे सरकार उभे आहे. नैसर्गिक आपत्तीत बळीराजाला सावरतानाच कोरोनाच्या संकटात सर्वसामान्यांच्या रक्षणासाठी भक्कमपणे काम केलं जात आहे. कोरोनाकाळात रुग्णसंख्या असो की मृत्यूसंख्या त्यात राज्य शासनाने लपवाछपवी केलेली नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

**संत गाडगेबाबांच्या दशसुत्रीनुसार काम**

संत गाडगेबाबांच्या दशसुत्रीनुसार हे शासन काम करीत असून जनतेच्या विश्वासाला तडा ...पान ६ वर

## शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ वाड्यात भारतीय जनवादी महिला संघटनेचा भव्य मोर्चा



**वाडा/प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ दिल्ली येथे सुरू असलेले देशव्यापी आंदोलनास अखिल भारतीय किसान सभा व अखिल भारतीय जनवादी महिला संघटना वाडा तालुका कमिटीच्या वतीने जाहीर पाठींबा व्यक्त करत गुरुवारी (दि.३) वाडा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. भाजपाचे केंद्र सरकार दिल्ली येथे सुरू असलेले शेतकरी आंदोलन बळाच्या जोरावर दडपून टाकु पाहत आहे. यासाठी शेतकऱ्यांवर पाण्याचा मारा करून, अश्रुधूर सोडून, शेतकरी नेत्यांना स्थानबद्ध करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करीत आहे. केंद्र सरकारच्या या शेतकरी विरोधी धोरणाचा व दडपशाहीचा अखिल भारतीय किसान सभा व अखिल भारतीय जनवादी महिला संघटना वाडा तालुका कमिटी जाहीर निषेध व्यक्त करीत असून, शेतकरी संघटनांच्या या आंदोलनास पुर्ण पाठींबा असल्याचे मत कॉ. आरती डावरे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी महिला कार्यकर्त्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

## किसान काँग्रेसच्या वतीने मोदींच्या पुतळ्याला जोडे मारून नोंदवला निषेध



**वाडा/प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ व दिल्ली येथे सुरू असलेले देशव्यापी आंदोलनास पाठिंबा दर्शविण्यासाठी वाड्यातील खंडेश्वरीनाका येथे गुरुवारी (दि.३) किसान काँग्रेच्या वतीने नरेंद्र मोदी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. व केंद्र सरकारच्या विरोधात रस्त्यावर बसून घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी किसान काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## पोलिसांच्या सतर्कतेमुळे गायींना मिळाले जीवनदान

# भिवंडीत कत्तलीसाठी चार चाकी गाडीतून गायींची चोरटी वाहतूक



**भिवंडी/प्रतिनिधी**

राज्य शासनाने गाय तसेच गोवंश हत्येला बंदी घातली असतांनाही चार चाकी वाहनातून चोरट्या मार्गाने गायीची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याची बाब भिवंडीत वारंवार समोर येत असतांनाच शहरातील शेलार नदी नाका येथे चार चाकी वाहनातून चक्क जिवंत गायीची वाहतूक केल्याचा धक्कादायक प्रकार बुधवारी सकाळी समोर आला आहे. विशेष म्हणजे गाडीचे नंबर प्लेट बदलून या गायी बाहेरून विकत आणल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे . दरम्यान तालुका पोलिसांच्या सतर्कतेने वाहनातील तीन गायींना जीवनदान मिळाले असून त्यांची रवानगी गोशाळेत करण्यात आली असून वाहन चालकासह एकूण पाच जणांवर तालुका



पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या शेलार नदी नाका परिसरात तालुका पोलिसांनी ऑल आऊट मोहीम राबवून नाका बंदी केली असता या नाका बंदीत टवेरा कंपनीची सफेद रंगाची गाडी अडवली असता गाडीतील इसमांनी गाडीतून त्वरित उद्या ...पान ६ वर





**राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी वसई विरार शहर जिल्हातर्फे आज केंद्र शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणा, कायदे बाबत संपूर्ण भारतात ह्या मोदी सरकार म्हणजेच भाजप सरकार विरुद्ध शेतकऱ्यांचे अहिंसक आंदोलन सुरु आहे. या आंदोलनाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सशर्त पाठिंबा देत आहे. यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या सूचनेनुसार आज वसई तहसीलदार इथे जिल्हाध्यक्ष राजाराम मुळीक यांच्या नेतृत्वाखाली घोषणाबाजी करून तहसीलदार वसई यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पक्षाचे सर्व फ्रंटल सेलचे अध्यक्ष व व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.**

# भिवंडीत वन विभागाच्या १५० एकर जमिनीवर मांगुर माश्यांचे १२६ पेक्षा जास्त अनधिकृत तलाव

## मांगुर माश्यांमुळे नागरिकांना कॅन्सरचा धोका



**भिवंडी/प्रतिनिधी**

आदिवासींचे विविध प्रलंबीत प्रश्न शासकीय पातळीवर मार्गी लावण्यासाठी राज्य आढावा समितीचे अध्यक्ष तथा श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित (राज्यमंत्री दर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली भिवंडी पंचायत समितीच्या सभागृहात शासकीय अधिकाऱ्यांसोबत मंगळवारी सायंकाळी एका आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष बैठकीत आदिवासींचे विविध प्रलंबीत प्रश्न व मानवी जातीला घातक असलेले व शासनाची बंदी असलेल्या मांगरूळ माशांची होणारी पैदास बंद करण्यात यावी अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली आहे. पर्यावरणाला अत्यंत घातक असलेल्या मांगूर जातीचे माशाची प्रजाती नष्ट करण्याचे आदेश केंद्र सरकारने १९ डिसेंबर १९९७ रोजी दिले गेले आहेत. राज्य सरकारनेदेखील आयुक्त, मत्स्यव्यवसाय महाराष्ट्र राज्य यांच्याकडून राज्यातील उपआयुक्त मत्स्यव्यवसाय यांना १६ जून २०११ रोजी मांगुर माश्यांच्या प्रजाती नष्ट करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. परंतू या विरोधात २०१८ मध्ये हरित लावादात याचिका दाखल करण्यात आली होती. त्याचाही निकाल सरकारच्या बाजूने लागलाआहे. मांगुर हा माणसाच्या जीवनाला तसेच पर्यावरणाला घातक असणारा मासा आहे. त्याची मत्स्यबीज केंद्रे आणि त्याचा तलावातील मत्स्य साठा संपूर्णपणे नष्ट



करण्याबाबतचा आदेश असतानाही भिवंडीमध्ये मुंबई - नाशिक महामार्गाच्या बाजूला नदी किनारी व वन विभागाच्या १५० एकर जमिनीवर १२६ पेक्षा जास्त तलाव आढळले आहेत. ...पान ६ वर

## शिवसेना वाडा तालुक्याच्या वतीने कोरोना योद्धांचा जाहीर सत्कार

**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना खानिवली-पालसई विभाग यांच्या वतीने कोरोना काळात अविरतपणे सेवा देणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.



वाडा तालुक्यातील खानीवली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सोमवारी (दि.३०) आयोजित केलेल्या समारंभात खासदार राजेंद्र गावित, आमदार श्रीनिवास वणगा यांच्या हस्ते डॉक्टर, नर्स, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, पोलीस कर्मचारी, सफाई कर्मचारी, वीज वितरण कर्मचारी आदींचा या वेळी कोरोना योध्याचे प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. खानीवली आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार एक सोनोग्राफी मशीन व एक्सरे मशीन एका महिन्याच्या आत उपलब्ध करून देण्याचे गावित यांनी आश्वासन दिले आहे. या प्रसंगी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षा ज्योती ठाकरे, वैष्णवी ठाकरे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख राजेशभाई शहा, जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष निलेश गंधे, गोविंद पाटील, प्रकाश केणी, उमेश पठारे, अरुण अधिकारी निलेश पाटील, उप तालुका प्रमुख भरत हजारे, कांती शेलार, विभाग प्रमुख दयानंद घरत, विशाल पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते.

